MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष चौदावे / अंक १० / ऑक्टोबर २०१३

## संपादकीय

### नकाराधिकाराचा निर्णय

अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उमेदवार नाकारण्याच्या अधिकाराचा विषय हा आपल्या लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल असा आहे. निवडणुकीला उभ्या असलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार मतदारांना लायक वाटला नाही, तर कोणालाही मत न देण्याचा अधिकार त्यांना आहे, असा हा निर्णय आहे. या निर्णयावर अनेक लेख लिहिले जातील, चर्चा होतील, हे स्वाभाविक आहे. यापूर्वी हा अधिकार होता, परंतु आपला नकार नोंदवण्यासाठी मतदाराला अर्ज भरावा लागे. लोकशाहीत आपले मत गोपनीय रहाणे हे अपेक्षित असते. परंतु अर्ज भरल्याने हा नकार उघड होत असे; असे झाल्यास नकारात्मक मत नोंदवणाऱ्या मतदाराला शोधून काढणे हे सोपे होते. ठाण्याच्याच एका प्रभागात अशा एका मतदाराला उमेदवाराच्या गुंडांनी मारल्याची घटना वर्तमानपत्रात वाचण्यात आली होती. असे होऊ नये आणि निवडणुकांचे पावित्र्य टिकून रहावे, उमेदवारांची सक्षमता वाढावी आणि परिणामी अधिक मतदान होईल असे सरन्यायाधीश पी. सतशिवम यांनी निर्णय देताना स्पष्ट केले. त्यामुळे स्वाभाविकच स्वच्छ प्रतिमेचे उमेदवार देण्याची जबाबदारी राजकीय पक्षांवर येईल आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण होण्याचे प्रमाण हळूहळू कमी होईल.

यासाठी स्वसंचालित मतदान यंत्रामध्ये नकारात्मक मत नोंदण्यासाठी स्वतंत्र बटण असावे, असे जनहित याचिका सादर कर्त्यांचे म्हणणे होते. आमच्या विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. महेश बेडेकर यांनीही तीन वर्षापूर्वी या संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेची दखल घेत, बटण असण्याचा हा पर्याय स्वीकारण्याबाबत विचार करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. एकीकडे राजकारणाचे गुन्हेगारीकरण होऊ नये असे म्हणायचे आणि न्यायालयाने लोकशाही व्यवस्थेचे शुद्धीकरण करण्या संदर्भात भूमिका घेतली, तर त्यावर बोळा फिरवाचा, असे दुटप्पी वर्तन आपल्याकडे चालू आहे. माहिती अधिकाराच्या कायद्याच्या कक्षेत राजकीय पक्षांना समाविष्ट करण्याच्या निर्णयाची पायमल्ली करणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता, हा इतिहास फार जुना नाही.

हा सर्व विषय राजकीय गुन्हेगारीकरण या बाबीशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे असे निर्णय योग्य की अयोग्य, हे ठरवण्याचा किंवा न्यायालयाचा अपमान करण्याचा कोणताही अधिकार नागरिकांना नसतो.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

राजकारणात वावरणारे गुंड प्रवृत्तीचे उमेदवार व कार्यकर्ते आणि जनता यांच्यातील हा संघर्ष आहे. त्यासाठी असे निर्णय घेतले जाण्यामागील कारणे व अन्वयार्थ यांचा विचार करावा लागेल.

स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढी आता संपत चालली आहे. या पिढीतील विचारवंतांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'इंग्रजांचेच राज्य बरे होते' हा विचार रुजला. याचा अर्थ, स्वातंत्र्यानंतर आपण राबवत असलेल्या लोकशाहीत दोष वाढत चालले आहेत. आपण निवडून दिलेले उमेदवार ही लोकशाही शासन पद्धतीची दिशाभूल आहे असा होतो. लोकशाहीचा अर्थही न जाणता ही राज्यपद्धती यशस्वी ठरलेला सर्वांत मोठा देश अशी भलावण भलेही कोणी करोत; पण स्वातंत्र्योत्तर पिढीला, विशेषतः विवेकनिष्ठ विचार करणाऱ्या विचारवंतांना स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार हे आपल्या लोकशाहीचे स्वरूप खटकत राहिले. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे असे संवेदनशील लोक व्यथित झाले. नागरिकांना लोकशाहीचा अर्थ कळला नाही व त्यांच्यातील उमेदवारच राज्यकर्ते झाले. यामुळे 'जसे लाक तसे त्यांचे शासनकर्ते' हे सत्य आपल्या देशातही खरे ठरू लागले.

आजचा सर्वसामान्य नागरिक हा नपुंसक अशा शांततेत जीवन जगतो आहे. शांतपणाने आपले अस्तित्व आपल्या भोवतीच केंद्रित करून कोशात वावरतो आहे.

या सर्वांचे मूळ कारण, लायकीपेक्षा जास्त पैसे लोकांच्या खिशात खुळखुळू लागले. परिणामी सारासार विचार, विवेक आणि निष्ठा संपत चालली. व्यसनांचे प्रमाण अतोनात वाढले. पैशांचा माज वाढत गेल्यामुळे आणि कैफ चढत गेल्यामुळे स्वैराचाराला प्रतिष्ठा मिळू लागली. माणसातील पशुवृत्ती वाढत चालली आणि राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाला मोकळे मैदान मिळाले. आज राजकारणाच्या या क्षेत्रात चांगले वाचन व अभ्यास असणारे विवेकनिष्ठ, सामाजिक बांधीलकी मानणारे कितीजण आहेत? हे मोजायला एका हाताची बोटेही जास्त ठरतील. सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे पूर्णतः अधःपतन झाले. शंभर कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या या देशात अशी परीस्थिती यावी, यापरते दुसरे दुर्दैव नाही.

नकार आधिकार आणल्यामुळे लोकशाहीचे शुद्धीकरण होईल असे काही नागरिकांनाही वाटत आहे आणि ते खरे ही आहे. राजकीय पक्षांच्या दृष्टीने हे संकट आहे, कारण त्यांच्या भ्रष्ट आचरणाला खीळ ठासणार आहे या निर्णयाची अमंलबजावणी करताना जनतेची दिशाभूल आणि भ्रष्टाचार होऊ नये; तसे झाले तर मात्र दुर्दैवाच्या दशदिशा विस्तारत जातील.

**– मोहन पाठक**

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

वर्ष चौदावे/अंक १०/ऑक्टोबर २०१३

वर्ष चौदावे/अंक १० /ऑक्टोबर २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | जपानी विद्यार्थ्यांबरोबर दोन आठवडे | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय नववा<br>विषय : राजविद्या राजगुह्य योग | कै. शं. बा. मठ | ५ |
| ४) | देव्यापराधक्षमापन स्तोत्र | श्री. मोहन पाठक | ९ |
| ५) | सायबर कायदे : एक ओळख | प्रा. विनोद एच. वाघ | १० |
| ६) | 'सुवर्ण-मंदार' | श्री. मुकुंद मराठे | १३ |
| ७) | सोनोपंत दांडेकर<br>आधुनिक महाराष्ट्राचे संत | श्री. सुधाकर ठाकूर | १८ |
| ८) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | २० |
| ९) | सद्‌गती - एक वाचनीय कथा संग्रह | श्री. मोहन पाठक | २५ |
| १०) | ऑन्टॉलॉजी | प्रा.श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये | २७ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात


- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी  आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही  आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# जपानी विद्यार्थ्यांबरोबर दोन आठवडे

*जपानचे विद्यार्थी सांस्कृतिक देवाणघेवाण या कार्यक्रमांतर्गत भारतात आले होते. त्यांच्या सहवासात असताना त्यांची जी ठळक वैशिष्ट्ये जाणवली त्यांचा हा परिचय – संपादक*

सांस्कृतिक देवाणघेवाण या कार्यक्रमाअंतर्गत १२ जपानी विद्यार्थी भारतात आले होते. जपानमधील क्योटो सॅन्यो विद्यापीठात हे विद्यार्थी पदवीच्या दुसऱ्या वर्गात शिकत आहेत. पदवीचा त्यांचा विषय आहे विविध संस्कृतींचा अभ्यास. त्यातल्यात्यात पौरर्वात्य संस्कृतीचा ते सखोल अभ्यास करतात. त्यामध्ये भारतीय संस्कृतीच्या अभ्यासावर त्यांचा विशेष भर आहे. प्राध्यापक मिशिओ यानो त्यांना भारतीय संस्कृतीचे धडे देतात. त्यांचा या विषयावरचा अभ्यास फारच दांडगा आहे. त्यांची मी सविस्तर मुलाखत घेतलेली असून त्यावर स्वतंत्र लेख लिहिण्याचा मानस आहे.



**जपानी विद्यार्थ्यांचा गट**

प्राध्यापक यानो आपल्या विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती प्रत्यक्ष दाखविण्याच्या उद्देशाने भारतात घेऊन आले. त्यातही येथील गणेशोत्सव बघता यावा या हेतूने त्यानी १ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर हा कालावधी निवडला होता. या कलावधीत ते ठाण्यातच राहायला होते. त्यांच्या येथील वास्तव्यात त्यांच्यासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचा संयोजक या नात्याने या सर्व मुलांशी माझा जवळून संबध आला. त्यांच्या वागण्या बोलण्यातून मला जे जाणवले तेच मी या लेखात साररूपाने देत आहे.

**१. वक्तशीरपणा–** सर्व विद्यार्थ्यानी वेळेचे बंधन अगदी काटेकोरपणे पाळले. सांगितलेल्या वेळेत सर्व विद्यार्थी हजर असत. कधीही आम्हांला त्यांच्यासाठी ताटकळत उभे राहवे लागले नाही. त्यांच्या परत जाण्याच्या एक दिवस आधी त्यांच्या प्राध्यापकांचे आम्ही व्याख्यान ठेवले होते. व्याख्यानाची वेळ २ ची होती. जेवण आटोपून मुले १ वाजता खरेदी करायला गेली. त्यांना खरेदी करायला पुरेसा वेळ मिळावा म्हणून तुम्ही उशीरा आलात तरी चालेल असे मी त्यांना सांगितले होते. तरीही सर्व मुले वेळेत परत आली. याहीपेक्षा मला कौतुक वाटले, ते त्यांच्या प्राध्यापकांचे. मी जरी त्यांना सवलत दिलेली असली तरी ते वेळ चुकवणार नाहीत याची त्यांना खात्री होती. त्यांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या वागणुकीने त्यांच्यावर मान खाली घालण्याची वेळ येऊ दिली नाही हे विशेष.

**२. ज्ञानाची लालसा–** भारतीय संकृती आणि भारतीय भाषा शिकण्यासाठी ते इथे आले होते. या कामात त्यानी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले होते. वर्गात तर ते सतर्क राहात असतच, त्याचबरोबर दिलेला गृहपाठ ते नियमितपणे करून आणत असत. टिंगल टवाळी करण्यात

किंवा गप्पा मारण्यात त्यांनी कधीही वेळ घालविला नाही. योग आणि प्राणायामाचे दिलेले धडे त्यांनी अगदी मन लावून गिरविले. मुंबईतील 'मणी भवन' ला दिलेली भेट असो, की कार्ला येथील लेण्यांना दिलेली भेट असो प्रत्येक संधी त्यांनी शिक्षणाची संधी मानली आणि तिचा पुरेपूर उपयोग करून घेतला. ज्ञानाचे शिंपले जेव्हढे गोळा करता येतील तेवढे गोळा करून ते परत गेले. त्यांची ज्ञानलालसा वाखाणण्यासारखीच होती.

**३. भावनांवर नियंत्रण**– एखादी नवीन घटना पाहिली की आपण लगेच आपले मत व्यक्त करतो. आपल्याला आनंद झाला की आश्चर्य वाटते ते लगेच दुसऱ्याला कळते. जपानी मुलांच्या बाबतीत हा अंदाज करणे कठीण असे. आपल्या भावना ते लगेच व्यक्त करीत नसत. माणसाचा चेहरा बोलका असतो असे म्हणतात. परंतु या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर काही दिसत नसे. त्यामुळे केलेली कृती त्यांना आवडली की नाही याचा अंदाजच येत नसे.

**४. टीका टिप्पणी टाळणे**– त्यांच्या देशाच्या तुलनेत आपल्याकडे प्रदूषण खूप आहे, वाहतूक व्यवस्था फारच वाईट आहे, सर्वत्र अस्वछतेचे सम्राज्यआहे, दारिद्र्याच्या खुणा पदोपदी दिसतात. यावर त्यांनी एक अक्षरदेखील काढले नाही. ऊलट भारतीय संस्कृतीचे गोडवेच ते गात राहिले. हा खरोखरच त्यांच्या मनाचा मोठेपणाच म्हणावा लागेल.

**५. अन्नाचा आदर**– आपले जेवण आपल्यासाठी कितीही चविष्ट असले तरी त्यांच्यासाठी ते पूर्णपणे नवीन होते. गटातील बऱ्याच जणाना मांसाहारी जेवण घेण्याची सवय होती. तरीदेखील आम्ही दिलेले शाकाहारी जेवण त्यानी आनंदाने खाल्ले. अन्नाला कधीही नाव ठेवले नाही. याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे कधीही पानात अन्न टाकले नाही. आपल्याला हवे तेवढेच घ्यायचे आणि ते चवीने खायचे, हा नियम त्यांनी पूर्ण दोन आठवडे पाळला.

जपानी मुलांच्या वागण्यातील मला जाणवलेल्या पाच बाबींचा मी येथे उल्लेख केला. त्याचे काय मोठे अप्रूप आहे असे वाचकांना वाटेल. मागील दहा वर्षे मी भारतीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीसाठी इंग्लंडला घेऊन जात आहे. त्याचबरोबर मागील सात वर्षे विद्यार्थ्यांचा एक लहान गट घेऊन चीनला जात आहे. या विद्यार्थ्यांचे वागणे आणि जपानी विद्यार्थ्यांचे वागणे यात जमीन अस्मानचा फरक आहे. वक्तशीरपणा आणि ज्ञानलालसा आमच्या विद्यार्थ्यांमध्ये अभावनेच आढळते. वेळेवर या असे बजावले असतानादेखील उशीरा येणारे विद्यार्थी अनेक असतात. भारतीय जेवणच पहिजे हा आग्रह पूर्ण करण्यासाठी आम्हांला अनेकदा इंग्लडमध्ये पायपीट करावी लागली आहे. अनेक चविष्ट ताजे पदार्थ टेबलावर ठेवले असता त्यांना नावे ठेवत आठवड्यापूर्वी घरी केलेले पदार्थ खाणारे भारतीय विद्यार्थी मी चीनमध्ये पाहिले आहेत. वस्तुसंग्रहालयात पाहण्यासारख्या अनेक वस्तू असताना बाहेर पडून गप्पा करण्यात अनेक भारतीय विद्यार्थ्यांना आनंद वाटतो असे हे मी अनेकदा पहिले आहे. या पार्श्वभूमीवर जपानी विद्यार्थ्यांच्या वागण्याचे मला जरा अप्रूपच वाटले.

काही वर्षापूर्वी जेव्हा जपानमध्ये त्सुनामी आली, तेव्हा शाळा सुरू होत्या. अनेक विद्यार्थ्यांना त्याची झळ पोहोचली. परंतु एव्हढ्या भीषण अपघातात विद्यार्थ्यांची संख्या मात्र होती फक्त ३९. याचे कारण संकटाच्या वेळी कसे वागावे, याचे त्याना प्रशिक्षण दिलेले असते. त्यांना दिलेल्या सूचनांचे ते योग्य तऱ्हेने पालन करतात. म्हणून, जपान राखेतून उठून उभा राहू शकतो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय नववा
## विषय : राजविद्या राजगुह्य योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील हा ९ व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो - संपादक*

**श्लोक १ ते ६ प्रभाव सहित ज्ञानाचा विषय**

श्रीकृष्ण म्हणतो – हे अत्यंत गुप्त असे विज्ञान युक्त ज्ञान तू निर्मत्सर असल्याने हे अर्जुना तुला मी सांगतो. जे जाणल्याने तू अशुभ स्थितीपासून दूर राहशील. हे ज्ञान सर्व विद्येमध्ये मुख्य सर्व गुह्यात अत्यंत गुह्य, उत्तम, पवित्र व अविनाशी, प्रत्यक्ष अनुभवास येणारे सुखाने आचरण करण्यास योग्य व पूर्णधर्म्य आहे. हे अर्जुना, या धर्मावर श्रद्धा न ठेवणारे लोक ईश्वराला प्राप्त न होता मृत्यूमय संसाराच्या मार्गात वारंवार भटकत राहतात.

ईश्वराकडून हे संपूर्ण जगत व्यापले आहे. तो अव्यक्त असला, तरीसुद्धा सर्व भूते ईश्वरात आहेत पण ईश्वर त्यांच्यात नाही. आणि ईश्वराच्या ठायी भूतेही नाहीत हा ईश्वरीय योग तू पहा. ईश्वर सर्व प्राणिमात्रांचे पालन पोषण करणारा आहे, तरी ही तो त्यांच्यात नाही. तथापि ईश्वर भूतांची उत्पत्ती करणारा आहे. ज्याप्रमाणे सर्वत्र वावरणारा महान साधु सर्वदा आकाशाच्या ठायीच राहतो. त्याचप्रमाणे सर्व भूते ईश्वराच्या ठायी आहेत, असे तू समज.

**श्लोक ७ ते १० जगाची उत्पत्ति**

हे अर्जुना सर्वभूते कल्याच्या शेवटी ईश्वराच्या प्रकृतीला प्राप्त होतात आणि पुनः ईश्वर कल्याच्या आरंभी त्या भूताना उत्पन्न करतो. ईश्वर आपल्या प्रकृतीचा आश्रय घेऊन प्रकृतीच्या अधीन झाल्यामुळे, परतंत्रासारखे राहणाऱ्या या संपूर्ण भूत समुदायाला पुनः उत्पन्न करतो. हे अर्जुना, या कर्मात आसक्तीरहित असल्यामुळे उदासीनाप्रमाणे राहणाऱ्या ईश्वराला ती कर्मे बंधनात घालत नाहीत. हे कुंतिपुत्रा ईश्वराच्या अध्यक्षतेखाली ही प्रकृती जड आणि चेतन जगत् निर्माण करते आणि यामुळे जग परिवर्तित होत आहे.

**श्लोक ११ ते १५ आसुरी लोकांची निंदा, भगवद् भजनाचे प्रकार**

प्राणिमात्राच्या महान ईश्वराच्या श्रेष्ठपणाला न जाणणारे मूर्ख लोक मानवी शरीराचा आश्रय करणाऱ्या ईश्वराची अवज्ञा करतात. त्यांची आशा, त्यांचे कर्म आणि त्यांचे ज्ञानही व्यर्थ आहे. कारण, ते अज्ञानी लोक मोहरूपी राक्षसी आणि आसुरी प्रकृतीचाच आश्रय करतात.

हे अर्जुना दैवी प्रकृतीचा स्वभावाचा आश्रय केलेले महात्मे लोक तर, ईश्वर सर्व भूतांचे आदिकारण आणि अव्यय आहे हे जाणून अनन्य मनाने माझे, ईश्वराचे भजन स्तवन करतात. ते नित्य योगाचारण करणारे भक्तीने ईश्वराचे सतत कीर्तन करतात. ते प्रयत्नशील दृढव्रती नमस्कार करीत ईश्वराची उपासना करतात आणि दुसरे लोकही ज्ञान यज्ञाच्याद्वारे यजन करणारे एकरवाने, पृथकभावाने, अर्थात अनेक प्रकारांनी सर्वतोमुखी अशा ईश्वराची उपासना करतात.

**श्लोक १६ ते १९ सर्वात्म रूपाने भगवंताच्या रूपाच्या प्रभावाचे वर्णन.**

ईश्वरच ऋतु, स्वधा, ओषध, मंत्र, घृत, अग्नि आणि हवनकर्म आहे. मी या जगाचा माता, पिता, धारण कर्ता, पितामह, पवित्र वस्तु, ओंकार, ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद

कपडे रंगविल्याने मनाचा रंग पालटत नाही.

आहे. ईश्वर अंतिम गति, पोषणकर्ता, स्वामी, साक्षी निवास स्थान, मित्र, उतपत्ती कर्ता, सर्वांना राहण्यासाठी स्थान देणारा, भाण्डार आणि अविनाशी बीज आहे. हे अर्जुना, मी सूर्य रूपाने तळपतो, पर्जन्याला आधार देतो आणि पर्जन्य पाडतोही. मी अमरत्व आहे आणि मृत्यूही आहे. मी सत् आणि असत्ही आहे.

**श्लोक २० ते २५ सकाम-निष्काम उपासनेचे फळ**

तीन विद्या जाणणारे सोम वनस्पतिरस सेवन करणारे निष्पाप लोक ईश्वराने यज्ञद्वारे यजन करून स्वर्गात आपली गति होण्यासाठी प्रार्थना करतात. ते पुण्याने प्राप्त होणाऱ्या देवेंद्र लोकाला प्राप्त होऊन त्या स्वर्ग लोकात दिव्य देव भोगांचा उपभोग घेतात. ते त्या विस्तृत स्वर्ग लोकात सुखभोग भोगून पुण्य संपल्यानंतर, मृत्यू लोकात येतात. अशा प्रकारे, तिन्ही विद्यांचे अनुयायी कामोपभोगी लोकांना गमन आगमनाचे क्लेश प्राप्त होात. अनन्य होऊन विचार करणारे जे लोक ईश्वराची उपासना करतात, त्या नित्य योगयुक्त असणाऱ्या लोकांचा योगक्षेम ईश्वर चालवितो.

जे कोणी अन्य देवतांची भक्ती श्रद्धायुक्त होऊन करतात ते ही हे कुंतीपुत्र अर्जुना, विधिहीन असले तरी ईश्वराचेच भजन करतात. कारण ईश्वरच सर्व यज्ञांचा भोक्ता व स्वामी आहे. ईश्वराला ते योग्य रीतीने ओळखत नाहीत. म्हणून ते इतर देवतांच्या मागे लागून पतन पावतात. देवतांचे व्रत करणारे देवताना प्राप्त होतात, पितरांचे पूजन करणारे पितराना प्राप्त होतात, भूत प्रेतादिकांचे उपासक भूतप्रेताना जाऊन मिळतात आणि ईश्वराला भजणारे ईश्वराला प्राप्त होतात.

**श्लोक २६ ते ३४ निष्काम भगवद् भक्तीचा महिमा**

पान, फूल, फळ अथवा पाणी ईश्वराला जो भक्तीने अर्पण करतो, त्या शुद्ध चित्ताच्या भक्ताने आणलेल्या त्या गोष्टी मी स्वीकारतो. हे अर्जुना, तू जे काही करतोस, खातोस, हवन करतोस, दान देतोस, तप करतोस, हे सर्व ईश्वराला अर्पण कर. अशा प्रकारे, सर्व कर्म ईश्वराला अर्पण केल्यावर शुभाशुभ कर्म बंधनातून तू मुक्त होशील आणि अशा रीतीने फल संन्यास योगाने तुझे अंतःकरण युक्त होऊन तू ईश्वराला प्राप्त होशील.

ईश्वर सर्व भूतावर समभाव ठेवतो. ईश्वराचा कोणी शत्रू नाही आणि मित्रही नाही. पण जे ईश्वराला भक्तीने भजतात ते ईश्वरात आणि ईश्वर त्यांच्यात आहे. अतयंत दुराचारीही जर अनन्य भावाने ईश्वराचे भजन करील तर तो जणू साधूच झाला असे समजावे, कारण की तो आता योग्य वर्तन करू लागला आहे. हे अर्जुना, तो लवकरच धर्मात्मा बनतो आणि निरंतरची शांती प्राप्त करतो. ईश्वराचा भक्त कधीही नष्ट होत नाही हे तू निश्चित समज. हे अर्जुना, जे पापयोनि आहेत, तसेच स्त्रिया, वैश्य, शूद्र ही जर ईश्वराचा आश्रय करतील, तर उत्तम गति प्राप्त करतील. मग जे पुण्यवान भक्त ब्राह्मण आणि राजर्षिगण आहेत. त्यांचे तर काय विचारावे? यासाठी या अनित्य आणि सुखरहित लोकांत जन्म घेतल्याने तू ईश्वराचे भजन कर.

ईश्वराच्या ठिकाणी मन लाव, ईश्वराचा भक्त हो, ईश्वराप्रीत्यर्थ यजन कर. ईश्वराला नमस्कार कर याप्रमाणे ईश्वर परायण होऊन आत्म्याचा ईश्वराशी योग केल्याने तू ईश्वराला प्राप्त होशील.

मनुष्याच्या आध्यात्मिक दिव्य जीवनाचा विकास करण्याठीच भगवद् गीता आहे. नवव्या अध्यायाचा निःसंशय तोच उद्देश आहे. जे लोक श्रद्धायुक्त होऊन द्वेष न करता या गीतोक्त मार्गाने आपल व्यवहार करतात, ते बांधनातून मुक्त होतात. हे अत्यंत गुह्य शास्त्र आहे. हे जाणणारा मनुष्य बुद्धिमान होतो. जो या गीताशास्त्राला सोडून स्वेच्छेने काम भोगात रमतो, त्याला सुख सिद्धि अथवा परमभक्ती प्राप्त होत नाही. कर्तव्य अकर्तव्य यासाठी मनुष्याला शास्त्रच प्रमाण आहे. म्हणून मनुष्याने

हे शास्त्र जाणावे व तद्नुरुप व्यवहार करावा.

ईश्वर सर्वांचा माता, पिता, पितामह, धाता (सांभाळणारा) भर्ता-पोषण करणारा, प्रभू साक्षी आश्रय स्थान, शरण जाण्यास योग्य, मित्र, उत्कर्ष कर्ता, अमृत, मृत्यू इत्यादी आहे. अनन्य होऊन जे लोक कार्य करतात, त्या नित्य योग्य कर्तव्य करणाऱ्यांचा योगक्षेम प्रभू चालवतो. जे काही तू करशील, खाशील, हवन करशील, दान देशील, तप करशील ते सर्व मला समर्पण कर. मग तू शुभ अशुभ कर्म बंधनातून सुटून जाशील. द्वेष आणि प्रीति बाजूला ठेवून समभावाने (पक्षपाती न बनता सर्वांशी व्यवहार केल्यानेच योगय रीतीने कर्तव्य पालन होते. याला समभावाचे वर्तन म्हणतात. ईश्वराच्या अध्यक्षतेखाली प्रकृति चाराचार सृष्टीची रचना करते. यामुळे जगात परिवर्तन होत रहाते. मला ईश्वराचा हा श्रेष्ठ भाव न ओळखल्यामुळे लोक ईश्वराची अवज्ञा करतात.

राक्षसी वा आसुरी प्रवृत्तीच्या मनुष्यांचा अखेर नाशच होतो. सुरुवातीला यांची उन्नती होत आहे, असे दिसते. पण ती उन्नतीच त्यांच्या नाशाला कारणीभूत होते. सुख आणि दुःख जसे आपल्याला होते तसेच इतरांनाही होते. हे अनुभवणे याचेच नाव समदृष्टी अथवा समभाव होय. मी आणि दुसरा केवळ एवढ्यानेच मनुष्याची दृष्टी कलुषित होते. समदृष्टी राहत नाही. हा समभाव सर्व काळ राहिला पाहिजे हेच योगसाधन होय.

या अध्यायाचे नाव राजविद्य, राजगुह्य असे आहे. विद्यानां राजा-राजविद्या उपनिषदात, विद्या म्हणजे उपासना असा अर्थ आहे. छांदोग्यात अनेक विद्यांचा उल्लेख आहे. श्रेष्ठ प्रकारची उपासना. नेहमी पवित्र श्रेष्ठ गोष्ट सरसकट सर्वांना प्राप्त होत नसे. त्यासाठी ग्रहण करण्याची पात्रता अजमावून पाहिली जाई, म्हणून या उपासना पद्धतींना गुह्य असे संबोधण्यात येत असे. या अध्यायाच्या सुरुवातीलाच ज्ञान विज्ञान हा शब्द पुनरपि आलेला आहे. इथे विज्ञान हा शब्द अनुभवयुक्त ज्ञान या अर्थी आलेला आहे. अनुभव युक्त ज्ञानासहित आत्मज्ञान प्राप्त झाले असता अर्जुना तू अकल्याणाच्या पलीकडे जाशील. म्हणजे अशुभाची निवृत्ती होईल म्हणून श्रीकृष्ण म्हणतो, - ज्ञान विज्ञानाचा विषय मी तुला पुनः सांगतो. हे ज्ञान झाले असता संसाराची असारता व आत्म्याचे सारत्व याची जाण होऊन तू मुक्त होशील.

हे श्रेष्ठ ज्ञान प्रत्येकाच्या हृदयात आहे. या हृदयातील सुखाचा आश्रय सोडून बहिर्मुख लोक विषय सुखाच्या मागे लागतात. एरव्ही मला पाहाण्या करता दूर कोठे जाण्याची गरज का भासावी . मी सर्व ठिकाणी व्याप्त आहे. प्रत्यक्ष दिसणारे जग हा माझाच विस्तार आहे. या विश्वात ओतप्रोत मीच आहे. प्रकृतिद्वारे हे विश्व निर्माण होते. मी निमित्त मात्र आहे. याचा अनुभव घ्यावयाचा झाल्यास इंद्रिय विषयांकडील धाव सोडून ती अंतर्मुख केली पाहिजेत. दैवीगुणांनी संपन्न असलेले महात्मे मी सर्वत्र आहे हे ओळखतात.

हे महात्मे सतत माझे नामसंकीर्तन करीत, विश्वातील पातके नाहीशी करीत विश्व महासुखाने भरून टाकतात. यांच्यामध्ये मी हमखास सापडतो. याद्ययावत सजीव आणि निर्जीव सृष्टीत मीच भरून राहिलो आहे हे ओळखून नम्रता पूर्वक शरण येऊन हे महात्मे मद्रूप होतात. आणखी एक उपासनेचा मार्ग, द्वैत प्रतीतीस कारणीभूत जे अज्ञान, त्याचा होम करून सर्व काही मीच एक आहे अशी प्रतीती घेण्याने ज्ञानरूपी यज्ञ सिद्ध होतो. हा एक यज्ञ प्रकार आहे. जगातील पदार्थ नामरूपाने भिन्न असले तरी त्या सर्वात मला अनन्य दृष्टीने जाणून घेण्याचा ज्ञानी भक्तांचा आणखी एक प्रकार आहे.

कोणतीही क्रिया माझ्याच ठिकाणी सहज अर्पण होत असते. सूर्य, इंद्र, वेद ही माझीच रूपे आहेत. मी नाही अशी जागाच नाही. अज्ञानी माणाची यज्ञादी कर्मे व्यर्थ

होत. यज्ञ करून फार तर स्वर्ग प्राप्ती होईल. मात्र माझ्याकडे येण्याचा मार्ग चुकतो. जे खरे भक्त आहेत तेच माझ्याकडे येतात. त्यांच्या योगक्षेमाचा भार मी घेतो. मला सोडून कामनेसाठी अन्य देवताकडे धाव घेणारे मलाच मिळत असल्यानेही त्याची तशी धारणा नसल्याने त्यांना माझी प्राप्ती होत नाही.

माझी भक्ती करणे, म्हणजे फार मोठे उपचार किंवा संकट नाही. निःसीम भक्तिभावाने दिलेले साधे पान हे सुद्धा मला अमृताहून गोड आहे. पूजोपचार हे केवळ निमित्त आहे. मी त्यांच्या ठिकाणी फक्त जिव्हाळा पाहतो. भक्त कोणत्या जातीचा आहे हे मी पाहात नाही. तो पूर्वीचा पापी दुराचारी असला व अनुताप होऊन त्याने पुढील आयुष्य माझ्या सेवेत घालविले, तर त्याला माझी निःसंशय प्राप्ती होईल. नालो ओढे हा भेद राहत नाही. शेकडो रीतीने जीर्ण झालेली ही आयुष्य नौका आहे. ती केव्हा बुडेल याचा नेम नाही. पण लोकांना याची फिकीर नाही. मृत्युजवळ आला याची दादही यांना नाही. मरेतोपर्यंत खुशाल तृष्णा वाढवत आहेत. माझी भक्ती करणे, म्हणजे शेवटी मला प्राप्त करून सुखरूप होशील.

अशा प्रकारे, भक्ती विचार या अध्यायात सांगितलेला आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

## *नोंद घेण्यासारखे*

*दि. २५ सप्टेंबर २०१३ रोजी मराठीतील नामवंत साहित्यिक शं. ना. (शन्ना) नवरे यांचे वृद्धापकाळामुळे डोंबिवली येथे निधन झाले.*

## *विचार करावा असं काही*

समाजजीवन सुविहितपणे पुढे सरकण्यासाठी भौतिकवादाइतकीच अध्यात्मवादाचीही गरज आहे. मात्र या दोहोंना जोडणारा विवेकाचा पूल हवा. अतिरेकी भौतिकवादाच्या आहारी गेल्यामुळे 'समृद्धी', 'विकासाच्या' आमच्या व्याख्याच बदलल्या. भरमसाट उत्पादन आणि त्याबरोबर बोकाळणारा उपभोगवाद या 'विकासा'च्या वाटेवरचे टप्पे या भरमसाट उत्पादनामुळे होणारे वाढते शहरीकरण, बेसुमार जंगलतोड, वाढते प्रदूषण, पर्यावरणाचा ढसळता तोल-अतिरेकी भौतिकवादामागून येणारे हे वादळ अधिकाधिक पुढे सरकत आहे. आता तरी आम्ही जागे होणार का? वृक्ष-वल्ली-वनचरांशी, निसर्गाशी नाळ जोडणारा 'अध्यात्मिक भौतिकवाद' आपलासा करणार का?

**– संग्रहातून**

●●●

## नोंद घेण्यासारखे

• रोनाल्ड केन या जागतिक कीर्तीच्या 'क्लासिकल इकॉनॉमिस्ट' यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी अलीकडेच निधन झाले. त्यांचा अर्थशास्त्रातील सिद्धांत महत्त्वाचा आहे.

• मानसशास्त्रातील विवेकनिष्ठ उपचार पद्धती(CREBT) चे जनक अल्बर्ट एलिस यांचे जन्मशताब्दी वर्ष २७ सप्टेंबर रोजी सुरू झाले.

साबणच वर्षानुवर्षे आंघोळ न करता राहू लागला, तर त्याला पाणी काय करणार!

# देव्यापराधक्षमापन स्तोत्र

## मराठी पद्यानुवाद

*ऑक्टोबर महिन्यात नवरात्र येते. त्याचे औचित्य साधून देवीच्या स्तोत्राचा अनुवाद - संपादक*

न मंत्र जाणत मी स्तुतिही न जाणतसे
आवाहन ध्यान तसे स्तुतिपर कथाही न जाणत मी
तुझ्या मुद्रा वा आळवणींचेही ज्ञान न मजला
पण आश्रये तुझ्या दुःखे सरतील जाणत मी ।।१ ।।

न ठावे रीत पूजेची तसा आळशी निर्धनही मी
केले न पूजन म्हणुनि त्वपदाही अंतरलो मी
तरी जनद्‌उद्धारिणी पार्वती उद्धर मज
पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ।।२ ।।

जगी असती सच्छिल तुझी सारीच मुले
परि अवखळसा मीच एक विरळ मुलगा
त्यागशील जरी मज न ठरे ते उचित परी
पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ।।३ ।।

जगन्माते न रचिली कधी पदसेवा
दिले नाही कधी द्रव्यही तुजला
तरी अतुलनीय प्रेम करिसी मजवरी
पुत्र निजे वाईट परि कुमाता न कधी ।।४ ।।

पूजाविधीसेवा करूनि बहु भागलो मी
त्यजुनि देव पंच्याऐशी वय गाठले मी
हे गणाधीश माते न करिसी कृपा जरी मजवरी
अनिकेत अवस्था मग जाऊ कोणा शरण मी ।।५ ।।

हे माते खलही गोड वदुनि वक्ता बनति
रंकही बाळगे सुवर्ण कोटीचे जवळी
प्रभाव मंत्रातील एकाक्षराचा असा
मग जपावर्तनांनी फळ किती अगाध मिळते ।।६ ।।

जटाधारी चिताभस्म लेपुनि विष पितो
कंठी सर्प माळांचे हार धारण करतो
वरले तुज जन्मांतरी तयाचेच फल प्राप्त त्याने ।।७ ।।

मोक्षाची नसे कांक्षा न सुख प्रपंचाचें
विशिष्ट ज्ञानही नको न सुख प्रपंचाचें
विशिष्ट ज्ञानही नको न सुख कोणतेही
हे मृडानी रुद्राणी शिव शिव भवानी जपता
जन्म सरावा मम, हेचि इच्छित मी ।।८ ।।

शास्त्रानुसार न पूजिले तुला आजवर मी
अपशब्द वदुनि चिंतीले कुविचारच मी
श्यामले निराधार जो मी त्या मजसी
तारशील तर उचितचि होईल ते ।।९ ।।

बुडालो संकटी म्हणुनि स्मरतो तुला
असे न मानी देवी करुणासागर तू
न लबाड हेतू मनी माझिया
भुकेले बालक स्मरते मातेला ।।१० ।।

हे माते कृपा झालिया तुझी
न नवल ठरेल ते जगती
अपराध मग्न मुलगा असूनि
माता कधी न दुर्लक्षी तयाशी ।।११ ।।

जगी न मज सम पापी पापनाशिनीतुजसम
हे जाणुनि महादेवी जे योग्य असेल ते करी ।।१२ ।।

श्रीशंकराचार्य विरचित देव्यापराधक्षमापन स्तोत्रं संपूर्णम् दुर्गार्पणमस्तु

पद्यानुवाद - **मोहन पाठक**
ठाणे

---

तुम्ही अनुभवाने शिकलेल्या गोष्टींपैकी बहुतेक गोष्टी अशा असतात की त्या न शिकल्या तरी चालले असते.

# सायबर कायदे : एक ओळख

*सायबर विश्व विस्तारत गेलं, तसे या विश्वातले गुन्हेगारांचे प्रमाण वाढलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात नवीन कायदे बनवले केले. त्यांचा हा त्रोटक परिचय – संपादक*

Ignorance of Law is no excuse हे कायद्यातील एक फार महत्त्वाचे तत्त्व आहे. एखादा गुन्हा घडल्यानंतर मी जे केले होते तो गुन्हा होता हे मला माहीत नव्हते, म्हणून मला त्याची शिक्षा देऊ नये हा बचाव कायदा कधीही मान्य करीत नाही. ज्या देशात आजही बहुसंख्य लोकांना जेव्हा सामान्य कायदे माहीत नाही, तेव्हा त्यांच्याकडून विशेष कायद्याचे ज्ञान असले पाहिजे अशी अपेक्षा करणे कदाचित कायद्याचा विद्यार्थी सोडून इतरांनी करणे काही अस्वीकारण्यासारखे नाही, परंतु कायद्याच्या दृष्टीने गुन्हा तो गुन्हा.

शास्त्रज्ञांच्या नवनवीन शोधांनी मानवी समाजाच्या जीवनाला एक नवा अर्थ दिला आहे. अनेक चांगल्या शोधांपैकी संगणक व इंटरनेट या शोधांनी तर जगाला चक्क एक (Global Village) जागतिक छोडे बनवून टाकले आहे. यामुळे व्यापर व व्यवसाय, संभाषण इ. मध्ये झालेल्या क्रांतीला जगाच्या इतिहासामध्ये तोड नाही. परंतु या शोधाच्या सकारात्मक बाबींचा गौरव करतांना नकारात्मक बाबी दुर्लक्षित करून चालणार नाहीत. मागील दशकामध्ये संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच केंद्र शासनाने २००० मध्ये Information Technology Act,2000 पारित करून संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून होणारे गुन्हे रोखण्याचा प्रयत्न केला आहे.

पारंपरिक चोर चोरी करण्यापूर्वी चोरी करावयाच्या घरातील एकूण परिस्थिती, वेळ व इतर अनेक गोष्टीचा अभ्यास करून चोरी करतो. परंतु संगणकाच्या शोधाने या नवीन चोराला घाबरविण्याचे फार कमी घटक सोडले आहे. हॅकींग (Hacking) व डेटा चोरणे (Data Theft) अशी नवी गुन्हेगारी या संगणकाने व इंटरनेटने जगाला दिलेली आहे. भौगोलिक सीमांच्या मर्यादा ओलांडून या शोधाने जगाला असा नवीन गुन्हेगार दिला आहे, की जो जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून कुठल्याही व्यक्तीची, संस्थेच्या महत्त्वाच्या कागदपांची, बँक खात्यांची माहिती चोरुन तिचा हवा तसा वापर करू शकतो. IT Act, 2000 प्रमाणे हॅकींग किंवा डेटा चोरणे या गुन्ह्यांसाठी ३ वर्षांपर्यंत कारावास व रुपये पाच लाखापर्यंत दंड होऊ शकतो. कदाचित या शिक्षा आपणांस समाधानकारक वाटू शकतात. परंतु त्यात असणाऱ्या अडचणी असमाधानकारक आहेत. उदा. पाकिस्तानमधील एखाद्या व्यक्तीने एखाद्या भारतीय व्यक्तीचे किंवा संस्थेचे अकांउट हॅक करून त्यातील डेटा/माहिती चोरून तिचा उपयोग केला तर, तेथे जाऊन त्याला अटक करणे शक्य होईल का? दुसरे उदाहरण म्हणजे लहानांपासून मोठ्यांपर्यंत आज प्रत्येकाकडे मोबाईल आढळतो. त्या मोबाईलमध्ये असलेले गाणे व्हिडीओ इ. विकत न घेता आपण ते आपल्या मोबाईलमध्ये upload करून घेतो. IT Act प्रमाणे ही देखील एक प्रकारची डेटा/माहिती चोरी करणे आहे व त्यासाठी वरील शिक्षादेखील आहे.

संगणक तज्ज्ञ सगणकांमध्ये चांगल्या प्रतीचे Anti Virus Software घेण्याचा सल्ला देतात. कारण बऱ्याच वेळा संगणक विध्वसंक मानसिकता असणाऱ्या काही संगणक अतिसाक्षरांच्या माध्यमातून काही Virus

---

जीवन हा एक घडविला जात असलेल्या सोन्याचा दागिना आहे. तो जितका काळजीपूर्वक घडविला जाईल तितका अधिक शोभेल.

संगणकांमध्ये वेगवेगळ्या प्रोग्रामच्या माध्यमातून सोडला जातो. ज्याची परिणिती संगणकामध्ये असलेली सगळी माहिती नष्ट करण्यामध्ये व संगणकाला हानी पोहचविण्यामध्ये होते. यामुळे बऱ्याच वेळा संगणकामध्ये जपून ठेवलेली महत्त्वाची माहिती नष्ट होते, म्हणून IT Act, 2000 ने यास गुन्हा म्हणून संबोधले आहे. ज्यासाठी असे करणाऱ्या व्यक्तीला तीन वर्षापर्यत कारावास व रुपये पाच लाखापर्यंत दंड होऊ शकतो.

फिशिंग (Phishing) हा एक well known असा सायबर गुन्हा आहे. ''लोकांना फसवून त्यांची खोटी व्यक्तिगत माहिती, बँक अकाउंट व क्रेडिट कार्डची माहिती वगैरे काढणे किंवा चोरणे तसेच पासवर्ड संस्थेच्या मूळ अधिकृत संकेत स्थळावर वापरून पैसे एकाच्या खात्यातून दुसऱ्या बोगस खात्यात पाठवून नंतर लंपास करणे या प्रकारच्या सायबर गुन्ह्याला फिशिंग असे म्हणतात.'' (ॲड. प्रशांत माळी – सायबर गुन्हे व कायदा) कित्येक वेळा वर्तमानपत्रातून आपण अशा प्रकारच्या गुन्ह्यांच्या बातम्या वाचल्या आहेत. IT Act, 2000 ने अशा गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यत सक्षम कारावास व रुपये एक लाखापर्यंत दंडाची शिक्षा आहे.

इंटरनेटचा वापर करून छळणे, घाबरविणे, बदनामी करणे नाहक त्रास देणे इ. IT Act, 2000 मध्ये Cyber-Bullying असे म्हणतात. या गुन्ह्यासाठी तुरुंगवास व दंड अशा दोन्ही शिक्षेचे प्रावधान या कायद्यात आहे. सोशल नेटवर्कींगमुळे आज हवी त्याची ओळख करून घेणे किंवा संदेशाच्या माध्यमातून त्याच्याशी संवाद करणे हे विशेषतः तरुण पिढीचे खास आकर्षण बनले आहे. बऱ्याचदा अशा सोशल नेटवर्कींगच्या माध्यमातून चेहऱ्यावर मुखवटा लावून किंवा खोटे नाव व छायाचित्र लावून इतरांना छळायचे, त्रास देण्याचे, बदनामी करण्याचे प्रकार वाढले आहे. या प्रकाराला आळा घालावा म्हणून IT Act, 2000 ने अशा कृत्यांना गुन्हा घोषित करून तो थांबविण्याचा प्रयत्न केला आहे.

सायबर आतंकवाद (Cyber Terrorism) असा हा गुन्हा रोखण्यासाठी IT Act, 2000 ने या गुन्ह्यासाठी आजीवन कारावास व दंड अश्या गंभीर शिक्षेचे प्रावधान केले आहे. देशाच्या सार्वभौमत्वाला इजा पोहचविणे किंवा इंटरनेटचा वापर करून देशातील लोकांमध्ये सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण करणे, छोटे व्हीडीओचे किंवा संभाषणांचे मॅसेजेस इंटरनेट व मोबाईलच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवून त्यांच्यात दहशत निर्माण करणे, अशा प्रकारच्या कृत्यांना सायबर आतंकवाद म्हणतात.

आज प्रत्येकाच्या e-mail अकाउंटवर एक करोड, दहा करोड रुपये लॉटरी जिंकल्याचा मॅसेज असतो, हा मॅसेज आपल्या मोबाईलवर पण कधी कधी येतो. समाधानी माणसं हा मॅसेज डिलीट करतात. पण असमाधानी व अज्ञानी माणसं ह्या मॅसेजला बळी पडून लुबाडले जातात. बऱ्याच वेळा आपल्याला लागलेल्या लॉटरीचा कुणालाही पत्ता लागू नये, म्हणून ते कुणालाही काहीही सांगत नाही, परंतु आपण लुबाडलो गेलो आहोत अशी जेव्हा खात्री होते तेव्हा मात्र पश्चाताप करण्याशिवाय काही पर्याय उरलेला नसतो. अशा गुन्ह्यांना IT Act, 2000 मध्ये e-mail Fraud असे म्हटले जाते. या गुन्ह्यासाठी तीन वर्षापर्यंत कारावास व रुपये एक लाखापर्यंत दंडाची शिक्षा आहे.

या व्यतिरिक्त e-mail Spoofing, Credit Card Fraud, Copy right Violation व Pronography व असे इतर अनेक गुन्हे व त्याच्या शिक्षा IT Act, 2000 मध्ये दिलेल्या आहे.

संगणकाचा व इंटरनेटच्या शोधामागे नक्कीच काही चांगली कारणे होती व आहेत. त्याचा चांगला उपयोग ही आज शिक्षण, व्यवसाय, उद्योग इ. क्षेत्रांत आपण करत


आहोत पण, त्याच बरोबर निर्माण झालेल्या या अपप्रवृत्ती देखील आपल्याला दुर्लक्षित करून चालणार नाहीत. IT Act, 2000 बनवून आपण अशा गुन्ह्यांना लगाम लावण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मागे सांगितल्याप्रमाणे हा गुन्हा मर्यादित आहे. याला जागेची, वेळेची, शारीरिक ताकदीची किंवा फार मोठ्या समूहाची काही गरज नाही. माउस (Mouse) च्या एका क्लिकवर होणाऱ्या या गुन्ह्यांमुळे सगळे विश्वच हैराण आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन अशा गुन्ह्यांना यशस्वीपणे तोंड देण्याची गरज आहे.

**– प्रा. विनोद एच. वाघ**
व्ही.पी. एम्स. टि.एम.सी.
विधी महाविद्यालय, ठाणे

●●●

## *श्रीराम अभ्यंकर*

श्रीराम अभ्यंकर, अद्वितीय गणिती यांचे नोव्हेंबर,२(२०१२) या दिवशी ८२ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जन्म उज्जैनला झाला. दि. २२ जुलै १९३० ही त्यांची जन्म तारीख. ग्वाल्हेर येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी मुंबईत आले. त्यावेळी प्रसिद्ध असणाऱ्या रॉयल इन्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये त्यांचे पुढील शिक्षण झाले. त्यावेळी नव्याने स्थापन झालेल्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रीसर्च या संस्थेत त्यांनी काही व्याख्याने ऐकली. मुंबई विद्यापीठातून १९५१ साली ते बी.एस.सी. (गणित) झाले व अमेरिकेत गेले.



**श्रीराम अभ्यंकर**
**(१९३०–२०१२)**

आयुष्यभर संशोधन करणाऱ्या या महान गणितीचा भारतातील गणिताचा विकास हा विशेष रस असणारा विषय होता. पुढे हार्वर्ड विद्यापीठातून एम.ए. व विद्यावाचस्पती या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. २०० शोध निबंध लिहिणाऱ्या अभ्यंकरांचा प्रबंधाचा विषय ही 'Resolution of singularities of algebraic surfaces in prime characteristic' या विषयातील प्रश्न सोडवण्यासंबंधी होता. जागतिक कीर्तीचे श्रीराम अभ्यंकर पुणे विद्यापीठात अनेक वर्षे गणिताचे प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. त्याच काळात १९५६ साली त्यांनी भास्कराचार्य प्रतिष्ठान ही संशोधन संस्था स्थापन केली. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यावाचस्पती पदवी प्राप्त केली. बीजगणिती–भूमिती या क्षेत्रातील अनेक स्तरांवर त्यांचा प्रभाव पडला व या विषयातील जगभरच्या अभ्यासकांचे ते प्रेरणा स्थान बनले.

**संदर्भ** : रिमेंबरींग श्रीराम एस्. अभ्यंकर – सुधीर आर. घोरपडे. 'रिझोनन्स : मे २०१३ पृ. क्र. ३९७ ते ४०३ + परिशिष्टे पृ.क्र. ४०३ ते ४११


●●●

गर्विष्ठ आणि विनयशील यांना ओळखण्याचे मुख्य गमक म्हणजे गर्विष्ठ माणूस आपली स्तुती आपणच गातो तर विनयशील माणसाची स्तुती दुसऱ्याला गावी लागते.

# ‘सुवर्ण-मंदार’

*संगीत भूषण राम मराठे यांचे चिरंजीव श्री. मुकुंदराव मराठे यांनी त्या अजरामर गायक नटावर लिहिलेला हा लेख (कै.) राम मराठे यांचे रंगभूमीला असणारे योगदान अविस्मरणीय आहे. – संपादक*

५० वर्षापूर्वी १९६३ मध्ये गुढीपाडव्याच्या सुमुहुर्तावर – विद्याधर गोखले लिखित संगीत नाटक ‘संगीत मंदामाला’ ने इतिहास घडविला. नृत्य-संगीत यांची बहार असणारे संगीतभूषण पं. राम मराठे यांची मुख्य भूमिका आणि संगीत दिग्दर्शन, शिवाय ज्योस्ना मोहिले, संगीतरत्न प्रसाद सावकार, नटवर्य विनोदमूर्ती शंकर घाणेकर, पंढरीनाथ बेर्डे हे सहकलाकार आणि नाट्यमंदार, रंगशारदाची उत्कृष्ट नाट्यनिर्मिती असल्याने या नाटकाचे शेकडो प्रयोग झाले. ‘‘वर्तमानपत्रातील मथळे – स्वयंवर-मानापमान अशा संगीत नाटकांचे सुवर्णयुग पुनश्च अवतीर्ण’’– ‘‘संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या गायकीने आणि संगीत दिग्दर्शनाने गानरसिक मंत्रमुग्ध’’ ‘‘गायनाचार्य भास्करबुवा बखले, बालगंधर्व यांच्या घराण्याचा वारसा चालवणारे संगीत मंदारमाला’’, ‘‘नृत्य-संगीताची अनोखी मेजवानी देणारे अप्रतिम नाटक’’, ‘‘बसंत-बहार-जुगलबंदी नाटकाचा उत्कर्षबिंदू’’, ‘‘मंदारमालामुळे संगीत नाटकांचे सुवर्णयुग अवतरणार’’, अशा अनेक मथळ्यातून मंदारमाला नाटकावर कौतुकाचा वर्षाव झाला.



संगीत पं. भूषण राम मराठे

**सुवर्ण-मंदारमालेचे मंतरलेले दिवस**

साठोत्तर संगीत नाटक-रंगभूमीवरील अत्यंत गाजलेले आणि अप्रतिम नृत्य संगीताने नटलेले असे संगीत नाटक, म्हणजे विद्याधर गोखले लिखित ‘संगीत मंदारमाला’!

संगीतभूषण पं. राम मराठी यांची मुख्य भूमिका आणि अप्रतिम संगीत दिग्दर्शन, संगीतरत्न प्रसाद सावकार, ज्योत्स्ना मोहिले या सहगायकांची जबरदस्त साथ असलेल्या नाटकातील पदे आजही अगदी युवापिढीच्याही कायम स्मरणात आहेत. ‘सोहम हर डमरू बाजे, ‘जय शंकरा गंगाधरा’ ‘जयोस्तुते उषादेवते’ ‘हरि मेरो जीवन प्रान अधार’ ‘कोण असशि तू नकळे मजला’ आणि या नाटकाचा परमोच्चबिंदू असलेली ‘बसंत की बहार आयी’ ही जुगलबंदी! अशी अवीट गोडीची १५ अजरामर गाणी या नाटकामधे आहेत.

नटवर्य केशवराव दातेंपासून अनेक दिग्गजांचा आशीर्वाद, मार्गदर्शन या नाटकाला लाभला होता. जेमतेज २०-२५ वयाच्या सुधाताई करमरकर यांनी या नाटकाचे


नाट्य व नृत्य दिग्दर्शन केले होते. हे विशेष!

पंढरीनाथ बेर्डे, नटवर्य शंकर घाणेकर (नंतर चंदू डेगवेकर!) राजाराम शिंदे इ. प्रमुख कलाकार भूमिकांमधे विलक्षण रंग भरत असत! प्रसाद सावकार मदनगोपाळ आणि शंकर घाणेकर, पठ्ठे भैरव हे दोघे नट त्यांच्या प्रवेशांमधे बहार उडवून देत असत!

५० वर्षापूर्वी गुढीपाडव्याच्या सुमुहुर्तावर संगीत मंदारमाला हे नाटक रसिकाचारणी प्रथम सादर झाले (गुढीपाडवा २६ मार्च १९६३ रोजी).

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या 'भारत नाट्य प्रबोधन संघाने' हे नाटक रंगभूमीवर आणले. सध्याचे शारदा चित्रपटगृह आणि कालनिर्णयचे कार्यालय या ठिकाणी असलेल्या रंगमंदिर, दादर या नाट्यगृहात या नाटकाच्या तालमी झाल्या. सुमारे ३।।–४ महिने वाचन, गद्य, संगीत दिग्दर्शन इत्यादी अथक परिश्रमानंतर आकार घेऊ लागले. कित्येक वेळा पं. रामभाऊंच्या दादर येथील लतिफ हाऊस येथेही संगीताच्या तालमी व्हायच्या!

शब्दरंजनकार, कालनिर्णयकारं (कै.)ज्योर्तिभास्कर जयंतराव साळगांवकर हे रामभाऊंच्या समोरच्याच इमारतीमधे राहात होते. अण्णा गोखले, रामभाऊ, जयंतराव ह्यांची खास मैत्री!


**मंदारमालातील शिकवणीचे दृश्य**

श्री. जयंतराव मंदारमाला आणि रामभाऊंच्या विलक्षण बुद्धिप्रधान गायकीसंबंधी बोलताना म्हणाले, ''मंदार म्हणजे कल्पवृक्ष! आणि आमचे रामभाऊ अक्षरशः एक समर्थ गायक म्हणून संगीत केलेचे कल्पवृक्षच होते. जी कल्पना त्यांच्या मेंदूत येत असे, ती क्षणार्धात गळ्यात विलक्षण तयारीने उतरत असे. सफेद–४ पट्टीमधे, तिन्ही सप्तकात आकारयुक्त, मुखबंदी, हुंकारयुक्त अशा विविध प्रकारांच्या जबरदस्त लयीतील हमसासयुक्त तरीही पेचदार अशा सुस्पष्ट जलद ताना, स्वरलगान, स्वरक्रिया, लय–तालावरचे प्रचंड प्रभुत्व आणि तरीही सर्वात महत्त्वाचे शब्दप्रधान कारुण्यमयी भावतोत्कट आणि कसदार घरंदाज गायकीचा अप्रतिम मिलाफ हे त्यांच्या सादरीकरणामधे सहजगत्या होत असे. एकाच दिवशी ४–४।। तासांचे तीन–तीन प्रयोग करण्याची विलक्षण शारीरिक आणि मानसिक क्षमता आणि नैष्ठिक बळ त्यांच्याकडे होते. ''आमचा रामभाऊ म्हणजे अक्षरशः नादब्रह्मात रमलेला संगीत योगी–तपस्वीच होता. शांत, निगर्वी स्वभावामुळे त्यांचे सांगितिक तेज अधिकच झळाळून निघत असे. माझ्याप्रमाणेच, आदरणीय यशवंतरावजी चव्हाण, ह. रा. महाजनी, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके, अल्लारखाँ, पं. रविशंकर, उ. हलीम जाफर खाँ, गुणिदास जगन्नाथबुवा पुरोहित, पं. सी. आर. व्यास असे अनेक दिग्गज मंदारमाला

पुन्हा पुन्हा पाहण्यासाठी, आनंद घेण्यासाठी येत असत!'' ज्योर्तिभास्कर सांगत होते.

१८८१ साली सुरू झालेले संगीत नाटक किर्लोस्कर, खाडिलकर, देवल, गडकरी, स्वातंत्र्यवीर सरवरकर, मामा वरेरकर, विश्राम बेडेकर, आचार्य अत्रे, रांगणेकर इत्यादींनी समृद्ध केले. परंतु १९३५ ते ५५ मरगळ आलेले संगीत नाटक पुन्हा एकदा नाटककार विद्याधर गोखले ह्यांच्या रूपाने एकदम ताजेतवाने रूप घेऊन रसिकांसमोर आले. १९५० ते ६० ह्या काळामधे बैजूबावरा, संगीत सम्राट तानसेन, गूँज उठी शहनाई, बसंतबहार, झनकझनक पायल बाजे, अमरभूपाळी असे संगीतकार, गायक नृतयवादक अशांच्या जीवनावर चित्रपट आले आणि ते उत्कृष्ट रागदारी संगीतामुळे गाजलेही!

स्वामी हरिदास, मियाँ तानसेन अदारंग, सदारंग असे बंदिशकार गायक नायक आपल्या देशामध्ये होऊन गेले. याच परंपरेत संगीताला 'पंचमवेदा'ची पदवी प्राप्त करून देणारे थोर गायक, विद्वान पंडित, नायक होऊन गेले. त्यांच्यातीलच ४-५ गायकांच्या जीवनातील काही प्रसंगांचे आधार घेऊन; तर काही काल्पनिकतेचा वापर करून एका अवलिया संगीतकाराच्या संगीत जीवनप्रवासावर आधारित मंदारमाला हे नाटक विद्याधर गोखले ह्यांनी लिहिले आहे.

हे कथानक १७ किंवा १८ व्या शतकात दरम्यान राजपुतान्यातील एका राज्यात घडले आहे असे गृहीत धरून वेषभूषा इत्यादींची मांडणी केली आहे. या नाटकाचा नायक 'मंदार'! दुनियेला विटलेले आणि स्त्री-द्वेषाची बाधा झालेले मन, सप्तसुरांच्या नादब्रह्मात रमविणारा वनवासी संगीतकार, अत्यंत तेजस्वी, सप्तप्रवृत्त कालाकर! मंदार, म्हणजे संगीताचा कल्पवृक्षच!

अशा या जनास विटलेल्या, स्त्री द्वेष्टचा संगीतकाराचे भावभक्तीच्या बळावर झालेले मधुर परिवर्तन रेखाटणे एवढेच आहे कथानकाचे मुख्य उद्दिष्ट, मुख्य सूत्र!

संगीतकाराच्या जीवनावर आधारित नाटक असल्याने संगीताच्या विविध आविष्कारांना अग्रक्रम आहे. पूर्वीच्या नाटकांसारखी शेकडो पदे न ठेवता आणि ४ तासांचे भान ठेवून, तसेच लागोपाठ पदे न येतील अशा विचाराने गोखले यांनी नाटकाची अप्रतिम मांडणी केली आहे आणि म्हणनूच संगीताला जास्त प्राधान्य देऊन कथानक राजकारण, दरबारी कावेबाज व्यक्तीशी निगडित असूनही, उपकथानकांमधे न अडकता साधे सरळ सुटसुटीत ठेवले आहे. पहिल्या प्रयोगापासून ह्या नाटकाबरोबर निगडित असलेले संगीतरत्न प्रसाद सावकारही या नाटकाच्या भावविश्वात रमून गेले. नाटकाच्या तालमीचा आनंद अवर्णनीयच होता. अण्णा गोखलेंची अत्यंत रसाळ पद्यरचना आणि अप्रतिम चटपटीत संवाद, संगीतावरील भाष्य, उतारे आणि विशेष करून नाट्यपद सुरू होण्यापूर्वी उत्कृष्ट पार्श्वभूमी तयार करणारे लयदार शब्दप्रधान, संवाद ही तर गोखले अण्णांची विलक्षण खासियत! संवादामधून अर्थात गद्यातून पद्य गाणे इतके बेमालूम सुरू होत असे, ज्यामुळे नाटकाच्या गतीला उत्तम पोषक अशी ऊर्जा मिळून रंगत वाढत असे.

पहिले १०० प्रयोग रंगमंदिर मुं.म. ग्रंथ से. दादरच्या वतीने केल्यानंतर नाट्यमंदारचे चालक राजाराम शिंदे यांनी हे नाट चालवायला घेतले आणि पहाता पहाता ४०० प्रयोगांचा पल्ला गाठला. संपूर्ण भारतभर या नाटकाचे प्रयोग झाले.

प्रयोगागणिक रामभाऊंचा बसंत बहार, जुगलबंदीमध्ये समोर बसून ऐकणे यासारखे भाग्य मला मिळाले. जोडरागांवर विलक्षण हुकुमत असलेले प्रत्येक प्रयोगात काही तर वेगळेच, अतर्क्य व अमानवी असे गात की मति अक्षरशः गुंग होऊन जात असे. प्रेक्षक कितीही

---

जर आपल्या मनात शांतता नसेल तर कोणत्याही बाह्योपचारांनी शांतता मिळणे शक्य नाही. - महात्मा गांधी

असोत, ते गायचा कधीही कंटाळा आळस करत नसत. पाटी टाकत नसत. अर्थात त्यांची तशी आम्हांलाही न बोलताच सक्त ताकीद नजरेतूनच मिळत असे.

ज्योत्स्ना मोहिले तोडी रागावरील आधारित 'सोहम' इतक्या अप्रतिम गायच्या की वन्समोअर ठरलेलाच! अप्रतिम स्वरलगाव, दमदारयुक्त पेचदार तानांनी हे पद त्या खुलवत असत.

पं. तुळशीदास बोरकर (ऑर्गन), ओजराज साळवी (तबला) मधुकर बर्वे (व्हायोलीन) आणि पखवाज – रामदास शिंदे या त्रयींची अप्रतिम तोडीस तोड साथसंगत, ह्या नाटकाच्या यशात अत्यंत महत्त्वाचा वाटा शिवाय पुरुषोत्तम वालावलकर, गोविंदराव पटवर्धन, दामूअण्णा पर्सिकर, उ. शब्बीर (सारंगी) यांनीदेखील काही प्रयोग वाजवले होते.

रत्नमालेची भूमिका करणाऱ्या ज्योत्स्ना मोहिले म्हणाल्या. शिकवणीच्या प्रसंगात रामभाऊ खुद्द तबल्याची साथ करत शिकवत असत. डावखुरे तबलावादक रामभाऊंकडे सहसही उ. मिरखवाँ बाज होता. काळी ५व्या उंच पट्टीमधे स्वतः गाऊन लयदार ठेका धरत ते शिकवत असत, राग विहागमधील बंदिश. शिवाय गौडमल्हारमधील बाहरियाँ आयी रे सावनकी बसंत बहार सर्वच अप्रतिम. अहिरभैरव, देसंकार, गुजरी तोडी, बैरागी, जोडकंस, रूमाज ठुमरी, सिंध भैरवी, हमी विलू, गौडमल्हार, मालकंस, बिहाग, हिंडोल आणि बसंतबहार इत्यादी रागांचा सुंदर वापर केला होता. जुगलबंदीमधील 'चक्रधार' हे तर रामभाऊंच्या सांगितिक गणिताचे विलक्षण कसब होते.

नाट्यमंदार, रंगशारदा प्रतिष्ठान ललितकलादर्श, भरतनाट्य संशोधन मंदिर पुणे इ. संस्थांनी या नाटकाचे ८०० हून अधिक प्रयोग केले. सर्व कलाकार महिला असाही मंदारमालाचा प्रयोग रंगला होता. ज्योत्स्ना मोहिलेनी रामभाऊंची 'मंदार' ही भूमिका निभावली होती. सावकारानंतर रामदास कामत, बालकराम, प्रकाश घांग्रेकर, पं. ए. के. अभ्यंकर यांनी ही भूमिका केली तर रत्नमालेची ज्योत्स्ना मोहिलेच्या आजारपणामधे ३० ते ४० प्रयोग प्रभा अत्रे यांनी तर पुढे मधुवंती दांडेकर, रजनी जोशी, जयमाला शिलेदार यांनी केली.

अर्थात 'मंदार'च्या भूमिकेसाठी पं. रामभाऊ मराठे हाच रसिकांच्या मनावरचा 'संगीत कल्पवृक्ष' कायम कोरला गेला आहे आणि चिरंतर स्मरणात राहील!

---

## आठवणी

मंदारमाला नाटकातील उत्कर्षबिंदू म्हणजे 'बसंत की बहार आयी' ही जुगलबंदी! वन्स मोअर मुळे व प्रयोग रंगल्यामुळे प्रयोग संपायला खूप उशीर होत असे. कित्येक रसिक ह्या जुगलबंदीचा आनंद चुकवू नये म्हणून शेवटची लोकलही सोडून देत असत!

एकदा कोकण-गोवा दौऱ्यामधे संगमेश्वर-देवरूख येथे प्रयोग होता. रात्री नेहमीप्रमाणे २-२।। ला प्रयोग संपला. जेवण करून पुढच्या ठिकाणी निघेपर्यंत सकाळचे ७ वाजले. बस सुटता सुटताच श्री. करमरकर म्हणून एक गृहस्थ भेटायला आले. ते रामभाऊंना म्हणाले, 'माझी आजी ९० वर्षांची आहे. तिने तुमचे 'जय शंकरा' हे पद रेडिओवर ऐकलयं. तुम्हांला प्रत्यक्ष पाहायची, भेटायची इच्छा आहे. रामभाऊंनी व्यवस्थापक निर्माता राजाराम शिंदे यांची परवानगी घेतली व काही सहकलाकारांसह त्या आजींना ते भेटायला गेले. त्यांचे आशीर्वाद घेतले. तेव्हा आजी म्हणाल्या,'हा माझा नातू भास्कर सांगत होता की नाटकात 'जय शंकरा' हे पद खूप आळवून गायलेस. थोडं ऐवतोस का? रामभाऊंनी कोणतेही आढेवेढे न घेता, त्वरेने ते आजींच्या स्वयंपाकघराकडे गेले आणि ठेका

---

खरे धैर्य हे शांत आणि थंड असते. खऱ्या शूराजवळ पाशवी शक्ती नसते. तो संकटकाळी न डगमगता शांत राहतो-पंडित श्री. दा. सातवळेकर

धरण्यासाठी योग्य पातेलं घेऊन ओल आणि स्वतः त्यावर ठेका धरून नाटकाप्रमाणे अगदी १०-१५ मिनिटे जय शंकरा हे पद आलाप, तानांसह त्या मातोश्रींसाठी सादर केले. आजींच्या नेत्रातून अश्रू अगदी अनावर झाले होते. हा हृदयद्रावक प्रसंग रामभाऊंच्या मित्राची मकरंदची भूमिका करणारे पंढरीनाथ बेर्डे यांनी सांगितला होता.

---

रामभाऊ पट्टीचे गवय्ये तसेच खवय्येही! नाटकाच्या दौऱ्यावर गेल्यावर घरोघरी 'चहा, पोहे इ. साठी आमंत्रण घेत असत! प्रसाद सावकार इ. कलाकार मंडळी आवाजासाठी पथ्य सांभाळत असत. पण रामभाऊ चहा, कॉफी, पोहे, खिचडी, उपमा, मोदक, पुरणपोळी, बटाटे वडे यथेच्छ खात आणि सपाटून जोरकस गातही असत.

संगीत मंदारमाला  मैलाचा दगड ठरले!

अखिल भारतीय कीर्तीचे घरंदाज गायक, बालनट, संगीतकार, संगीत रंगभूमीवरील गायक नट, उत्कृष्ट तबलावादक, बंदिश रचनाकार, संगीतभूषण पं. राम मराठे!

---

अनेक प्रचलित तसे अनवट रागांवर आणि विशेष करून बसंतबहार, हिडालबहार, भैरव भटियारसारख्या जोडरागांवर प्रचंड प्रभुत्व! जोडरागांचा बादशहा म्हणून मान्यवरांकडून (पं. कुमार गंधर्व इ.) गौरव!

---

शास्त्रीय, रागदारी, ख्याल गायकी, ठुमरी, तराणा, नाट्यसंगीत, भावगीत, भक्तिगीत, अभंग, हिंदी भजन अशा अनेकविध गायनप्रकारांनी मैफल समृद्ध होत असे. अखेरपर्यंत पांढरी ४ काळी ५ अशा उंच पट्टीमधे गायकी सार करणारे गायक कलाकार!

प्रचंड मेहनतीने, रियाजाने आग्रा, ग्वाल्हेर, जयपूर अशा तीनही घराण्यांची गायकी आत्मसात करून स्वतःची अशी परंपरायुक्त गायकी लोकप्रिय केली. विलक्षण ताकदीने, क्षमतापूर्ण प्रचंड स्टॅमिना (रात्री ९.३० ते पहाटे ४ वाजेपर्यंत मैफल चाले. एका दिवसामध्ये ४-४।। तासांचे २ ते ३ संगीत नाट्यप्रयोग करून रात्री संपूर्ण मैफल सादर करायची विलक्षण शारीरिक क्षमता असलेला, कोणतेही पथ्य न पाळणारा असा अजोड गायक.

बालगंधर्व, मास्तर कृष्णरावांची लडिवाळ गायकी, जयपूर घराण्याच्या लय-पेचबद्ध तानपलटे, ग्वाल्हेरची लयकारी तर आग्रा गायकीची नोमतोमयुक्त भारदस्त गायकी, भावप्रधान, रागशुद्धता, पल्लेदार दाणेदार स्पष्ट जलद लयीत तानक्रिया तसेच मुखबंदी तान आणि प्रचंड हमसासयुक्त सुरेल गायकी! उ. विलायतहुसेन खाँ, पं. गुणिदास उर्फ जगन्नाथबुवा पुरोहित, पं. वामनराव सडोलीकर, मास्टर मनहर बर्वे, मास्टर कुष्णराव, पं. मिराशीबुवा अशा जेष्ठ गुरुंकडून कठोर ठमेहनतीने तालीम साध्य केली!

पं. वझेबुवा, मल्लिकार्जुन मन्सूर, सवाई गंधर्व, रहिमतखाँ, फैय्याजखाँ, गजाननबुवा जोशी, विनायकबुवा पटवर्धन अशा बुजुर्ग गायकांचा प्रचंड प्रभाव आणि त्यांच्या लकबीसह हुबेहुब गायकी सादर करत असत.

देवगंधर्व गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले हे निस्सिम श्रद्धास्थान. त्यांच्या गायकीचा यथार्थ वारसा चालवणारे अजोड गायक, राम मराठे !

**- श्री. मुकुंद मराठे**
(संगीत गायक-नट)
'नादब्रह्म' बंगला पं. राम मराठे पथ,
ठाणे - पूर्व-४००६०३
भ्रमणध्वनी - ९८९२३१५७३१

●●●

सत्याला शपथांचा आधार लागत नाही. - सिसेरो

# सोनोपंत दांडेकर
# आधुनिक महाराष्ट्राचे संत

*कै. सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर हे भगवद् भक्त म्हणून उभ्या महाराष्ट्रातील भक्तांना माहीत आहेत. केळव्याचे आमचे स्नेही श्री. सुधाकर ठाकूर यांनी त्यांच्यावर लिहिलेला त्रोटक व परिचयात्मक लेख – संपादक*

सोनोपंतांचा जन्म केळवे गावी २२.०४.१८९६ रोजी झाला. दुर्दैवाने तयांची आई ते दीड वर्षाचे असतानाच परलोकवासी झाली. त्यांचे संगोपन चुलत आजी उमा व त्यांचे मामेभाऊ कै. काका कार्लेकर आणि त्यांच्या पत्नी मथुताई यांनी केले. सोनोपंताचे वडील भाऊसाहेब दांडेकर जुन्या पिढीतील देवभक्त, सदाचारी गृहस्थ होते. चातुर्मासात घरी पुराणिकांकडून दररोज श्रीमद भागवत, रामायण, महाभारत, भगवद् गीता सांगवून घेत असत. सोनोपंत पुराण ऐकण्यास बसत असत. लहानपणी ते श्री मुरलीधर व श्री विठोबा रखुमाईची दररोज पूजा करीत असत. मूर्तीसमोर कीर्तन करीत असत. मुंज झाल्यावर त्यांना संध्या, वैश्वदेव, पुरुषसूक्त, गणपती अथर्वशीर्ष शिकविण्यात आले. ते नियमित संध्या, सूर्यनमस्कार, पूजा करीत. अशा रितीने त्यांच्या मनावर भागवद् धर्माचा संस्कार लहानपणापासूनच झाला होता.



कै. सोनोपंत दांडेकर

शाळेमध्ये त्यांचा क्रमांक नेहमीच पहिला असे. गावातील विद्वान दादाशास्त्री दामले यांनी सोनोपंतांची जन्मकुंडली करून दिली होती. ती जन्मकुंडली पाहताच ज्योतिषी त्यांच्या वडिलास सांगत, ''तुमचा मुलगा असामान्य भगवत्भक्त होईल.'' आपल्या मुलांनी चांगले शिकून विद्वान व्हावे व नावलौकिक मिळवावा असे त्यांना वाटत असे. त्यानुसार त्यांनी सोनोपंतांना पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात पहिलीच्या वर्गात घातले. १९१२ साली ते मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले. १९१७ साली बी.ए.च्या परिक्षेत तत्त्वज्ञान विषय घेऊन दुसऱ्या वर्गात व १९१९ साली एम.ए. झाले. प्रा. रामचंद्र दत्तात्रय रानडे या तत्त्वशिरोमणी शिक्षकाचा सहवास त्यांना लाभल्यामुळे त्यांच्या जीवनाला विशिष्ट वळण लागले. प्रा. रानड्यांच्या शिफारशीवरून सर परशुरामभाऊ कॉलेजच्या मंडळींनी सोनोपंताना आपल्या संस्थेचे आजीव सभासद करून घेतले. १९२० साली त्यांना मुंबईच्या रामनारायण रुईया कॉलेजमध्ये बोलविण्यात आले सुमारे साडेचार वर्षे व्हाईस प्रिंसिपॉल म्हणून काम केल्यावर त्यांना प्रिंसिपॉल नेमण्यात आले. यापुढे सेवानिवृत्त व्हावे असे विचार त्यांच्या मनात असतानाच त्यांना सर परशुरामभाऊ कॉलेजचे प्रिंसिपॉल म्हणून नेमण्यात आले.

सोहनींच्या वाड्यात राहत असताना कै. विष्णुबुवा जोग यांच्याशी त्यांचा संबंध आला. त्यामुळे ज्ञानेश्वरी

---

हल्ला करणाऱ्या शत्रूला भिऊ नका पण स्तुती करणाऱ्या मित्रापासून सावध रहा! – नेपोलियन

अमृतानुभव, भागवत इत्यादी ग्रंथांचे अध्ययन जोगबुवांच्या देखरेखीखाली झाले. जोगमहाराजांच्या प्रभावी निरुपण शैलीने त्यांच्या मनाची पकड घेतली. हा सहवास उत्तरोत्तर वाढत गेला. सोनोपंतानी जोगमहाराजांचे रीतसर शिष्यत्व स्वीकारुन वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली.

डोक्याला पांढराशुभ्र फेटा, भाळी पांढरे उभे गंध, गळ्याभवती पांढरेशुभ्र उपरणे, अंगात करड्या रंगाचा खादीचा गळाबंद कोट आणि मुखावर एक प्रकारचे तेज आणि प्रसन्नता. नामवंत महाविद्यालयाचे प्राचार्य असलेल्या सोनोपंतांना या वेषात कीर्तन करताना पाहून ज्ञानदेव एकनाथांच मिश्रीत रूप पहात असल्याचा भास होत असे. बहुजन समाजाचा खराखुरा कर्मवीर अडाणी जनतेला हरिभक्तीचे खरे रूप पटवून देऊन सुखाच्या संसाराचा मार्ग दाखवीत असे. बहुजन समाजाला कीर्तनाच्या द्वारा हरिनाम आणि हरिभक्तीची गोडी लावून जीवन आनंदमयी व सुखाचे करण्यास त्यांनी दृष्टी दिली. आपल्या अमृतवाणीने त्यांनी बहुजन समाजाला आपल्याकडे खेचून घेतले. म्हणूनच महाराष्ट्राचे आदर्श धर्मप्रचारक म्हणून त्यांचे स्थान आहे.

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो।।

या उक्तीप्रमाणे सोनोपंत हे आधुनिक महाराष्ट्राचे संत होते. त्यांची कामगिरी एवढी मोठी आहे की साऱ्या महाराष्ट्राने आदराने माना तुकवावी. लोकशिक्षण, लोकजागृजी आणि लोककल्याण हे त्यांचे अंगीकृत कार्य होते. सोनोपंतांच्या व्याख्यानात श्रोते अगदी रंगून जात असत. अगदी देहभान विसरत. याचे कारण त्यांचे उज्ज्वल चारित्र्य आणि प्रतिप्राद्य विषयाबद्दल असणारा जबर आत्मविश्वास. त्यांच्या निर्मळ चारित्र्याचा परिणाम एवढा मोठा असे की ते नुसते बोलायला उभे राहिले की श्रोत्यांना काही विशेष ऐकायला मिळणार याची खात्री वाटत असे. शुद्ध स्पष्ट शब्दोच्चार, निसर्गतःच मोठा पण मधुर आवाज. त्यात अनुभवाचा ओलावा, विषयावरील प्रभुत्व आणि सदाचाराचे सामर्थ्य इतक्या गोष्टींचे पाठबळ त्यांच्या प्रवचनास असे. प्रवचनकार म्हणून समाजाच्या सर्व थरात ते प्रिय होते. त्यांची भाषा बोली भाषेच्या जवळपास जाणारी होती. त्यामुळे त्यांचे लेखन वाचतानाही आपण एखादे प्रवचन ऐकत आहोत असा भास होतो.

जीवनाचे तत्त्वज्ञान आत्मसात केल्यामुळे व मानवी मर्यादा ओळखल्यामुळे सोनपंताचे जीवन आनंदमय होते ते सदा प्रसन्न दिसत. कोणत्याही प्रसंगाने ते कधी विचलित होत नसत. पंढरपुरच्या हरिजन मंदिर प्रवेशाच्या वेळी साने गुरुजींनी एका लेखात प्राचार्य दांडेकरांना वेदांत शिकवूनही तो स्वतःला मुळीच समजलेला नाही असे धाडसाने विधान केले होते; खरे म्हणजे वेदान्त हेच त्यांचे जीवन होते. ते त्यांना समजले नाही असा आरोप करणारे साने गुरुजी ख्यातनाम समाजसेवक व साहित्यिक होते. शिवाय पंढरपूरचा त्यांचा सत्याग्रह! साहजिकच त्यांच्या विधानात काही अर्थ असला पाहिजे असे सामान्य माणसाला वाटले. साने गुरुजींच्या दुःखद निधनानंतर त्यानी आपल्या अधिकारात ते कॉलेजचे माजी विद्यार्थी होते म्हणून कॉलेजला सुट्टी दिली. मतभेद प्रामाणिक असू शकतात, परंतु जीवनही तेवढेच महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटत असे. सर्व लौकिक व्यवहार करीत असतानाही मनातून ते निवृत्त असत. मनात निवृत्त आणि जनात प्रवृत्त असे त्यांचे वर्णन करता येईल ते आदर्श कर्मयोगी होते. लोकशिक्षक व लोकसंग्राहक असणारे सोनोपंत निर्भीड पण भिडस्त शीघ्रकोपी, पण प्रेमळ, विद्वान पण सर्वांशी सौजन्याने वागणारे होत. ते एका कॉलेजचे केवळ 'प्राचार्य दांडेकर' नव्हे, तर सर्वांचे सोनूमामा होते.

**– श्री. सुधाकर ठाकूर**
केळवे
जि. ठाणे

●●●

अपराध करून जो सुख मिळवितो त्याला देव कधीही क्षमा करीत नाही. – भगवान गौतम बुद्ध

# साहित्य-जगत

*ग्रंथप्रसारक श्री. शरद जोशी यांच्या वाचकप्रिय लेखांतील पुढील लेख – संपादक*

**भारतीय ग्राहक चळवळ : सिद्धांत साधना–सिद्धी एक समाजोपयोगी अपूर्व ग्रंथ**

राष्ट्रीय ग्राहक प्रबोधिनी (पंजीकृत), ५०५, कसबा पेठ, पसायदान, पुणे–४११०११. या संस्थेने जून २०१३ मध्ये प्रसिद्ध केलेला एक अत्यंत उपयुक्त ग्रंथ, म्हणजे 'भारतीय ग्राहक चळवळ : सिद्धांत साधना–सिद्धी'–ले. श्री. बिंदुमाधव जोशी, आखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्राहक सदन, ६३४, सदाशिव पेठ, पुणे–४११०३०, पृ.४००, मूल्य रु.४००/– देणगी मूल्य रु.२२०/– ग्राहक चळवळीचे आद्य प्रवर्तक श्री. बिंदुमाधव यांच्या तेजस्वी कार्याचा या ग्रंथामध्ये परिचय आहे. त्यांच्या तेजस्वी विचारांचे संकलन पुढीलप्रमाणे :–

**ग्रंथाचे प्रयोजन**

डॉ. विजय लाड (कार्याध्यक्ष राष्ट्रीय ग्राहक प्रबोधिनी) आपल्या मनोगतात(ग्रंथ प्रयोजन) म्हणतात, ''पहाता पहाता बटु वामनाने विराट रुप धारण करावे तसेच पुण्यात एका बिंदुने (बिंदुमाधव जोशी) १९७३ मध्ये ग्राहक चळवळीनंतर ग्राहक पंचायत या नावाने सुरू केलेल्या कार्यालयाने ४० वर्षात भारतीय ग्राहक चळवळ म्हणून देशव्यापी विराट रूप धारण केले आहे. मार्च २०१२ मध्ये भारत सरकारने श्री. बिंदुमाधव जोशी यांना भारतीय ग्राहक चळवळीचा आद्य प्रणेता (पॉयोनियर ऑफ इंडियन कन्झुमर मुव्हमेंट) म्हणून त्यांचा दिल्लीमध्ये सत्कार केला. न्या. छागला म्हणाले होते की, जे पुण्यात स्वीकारले जाते, ते भविष्यात स्वीकारले जाईल. न्या. छागलांच्या भविष्य वाणीवर भारत सरकारने मोहोर उमटविली. बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहक चळवळीसाठी ज्या घटना देशात घडावयास पाहिजेत, असे म्हटले होते त्या घटना केंद्र व राज्य सरकारांनी स्वीकारल्या आणि कार्यान्वित केल्या. एवढेच नाही तर भारतीय जनतेने ग्राहक म्हणून संघटित होऊन अर्थक्षेत्रात ग्राहकांची तिसरी शक्ती उदयास आणली आहे. योग साधनेतल्या एका उच्च परंपरेतल्या स्वातंत्र्य सैनिकाने कुठलीही निवडणूक न लढवता महाराष्ट्र राज्याच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाचा रथ विजयी मार्गावरुन नेण्याचा आदर्श प्रस्थापित केला ही घटना विशेष होय.

**ग्राहक एक राजा**

बिंदुमाधव जोशी म्हणतात, 'या देशात समतेचा आणि समृद्धीचा अमृतकुंभ आणण्यासाठी, दुष्ट शक्तीच्या सर्पांना पायाखाली रगडून मनात घुमणारी वेदनांची वादळे पंखात घेऊन, या देशाचे जयगान जगात गर्जत ठेवण्यासाठी पक्षिराज गरुडाप्रमाणे या देशाच्या ग्राहक चेतनेने गरुड झेप घेऊन शोषण मुक्तीचा संकल्प पुरा केला पाहिजे. 'ग्राहक : एक राजा' ची गर्जना करून झेप घेताना आम्हांला 'राष्ट्र देवो भव' च्या तेजोवलयाचा कधीही विसर पडता कामा नये. देशाचा कायाकल्प करणे हा देशातील ग्राहक चळवळीचा एकमात्र हेतू आहे.

**ग्राहक चळवळीचा वचननामा**

जे खळांची संकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो, भूता परस्परे पडो, मैत्र जीवांचे। दुरितांचे मिमिर जावो, विश्वस्वधर्म सूर्यो पाहो, जो जे वांछील तो ते लाहो

प्राणिजात।... किंबहुना सर्वसुखी पूर्ण होऊन तिन्ही लोकी भजि जो आदिपुरुखी अखंडीत।

समाधिस्त होताना ज्ञानेश्वरांनी ज्या ज्या इच्छा व्यक्त केल्या त्यांची पूर्तता करण्यासाठी भारतीय ग्राहक चळवळ जन्माला आलेली आहे. ईश्वरनिष्ठांची मांदियाळी उभारून या वचननाम्याची पूर्तता करू या. भारताला विश्ववंदिता करू या. ज्ञानेश्वर माऊलीचा हा विश्वविख्यात अभंग शिरोधार्य मानून बिंदुमाधव मोठ्या नम्रतेने म्हणतात. 'मला राज्यपदी बसण्याची इच्छा नाही ना मला स्वर्ग हवा आहे, ना मोक्ष. प्राणिमात्रांचे दुःख दूर करण्याची एकमात्र इच्छा ठेवून मी काम करतो आहे. वंदेमातरम्'

**ग्रंथाचे अंतरंग**

सिद्धांत विभाग १ (पृ.१५ ते १०२) साधना विभाग २(पृ.१०४ ते २१७) व 'सिद्धी' विभाग ३(पृ२२१ ते ३२०) यातून ५० प्रकरणांमध्ये अत्यंत मौलिक विचार मांडलेले आहेत. 'सिद्धांत'मध्ये ते म्हणतात, 'संत ज्ञानेश्वरांनी म्हटले,'मोरा असशी पिले डोळसे। परि एकाही दृष्टी नसे!!' म्हणजे केवळ डोळे असून चालत नाही, पहाणे असूनही भागत नाही तर त्याला दृष्टी असावी लागते. दृष्टी, म्हणजे मनाला समजलेली दिशा. भारतीय ग्राहक चळवळ हे काही एखाद्या आंदोलनाचे वादळ नाही. ऐश्वर्य संपन्न शोषणमुक्त भारताच्या नवनिर्माणाचा हा प्रकल्प आहे. ग्राहकांचे ग्राहकांनी राष्ट्रोत्थानासाठी वेदान्तविज्ञानावर आधारित असे हे अनुष्ठान आहे. या अनुष्ठानातून ग्राहक दृष्टी (कन्झ्युमर आय) तयार करावयाची आहे.

'साधना' प्रकरणात ते म्हणतात, ''सिद्धांताचे ग्रंथ लिहून व्याख्यानांचे मोहोळ उठवून समाज परिवर्तनाची चळवळ उभी राहू शकत नाही. बीजापासून जसा विराट वृक्ष उत्क्रांत होतो, तशी 'वृक्ष-साधना' करून भारताच्या शोषण मुक्तीची चळवळ अनेक सकारात्मक उपक्रमांतून उत्क्रांत करावयास हवी, त्याच बरोबर कार्याचे स्वरूप दर्शन घडलेला मी लोकांसाठी म्हणून कार्यरत साधकांचा समूह गट ठिकठिकाणी तयार करून एक सामाजिक मन (मास्टर माईंड) तयार करणे हीच शोषण मुक्त भारतासाठी सगुण साधना!! अर्थात साधना म्हटल्यानंतर संमोह आलेच. पण हा आहे अनासक्त कर्मयोग!''

तिसरा विभाग सिद्धी : त्यात पृष्ठ क्र. २२१ ते ३१९ मध्ये ३२ ते ५० प्रकरणे दिलेली आहेत. प्रत्येक प्रकरणांत ग्राहक संरक्षण ग्राहकांचे रक्षण करणारे १५ कायदे कौटुंबिक अंदाजपत्रक कर आकारणीचे नियम व ग्राहक शेतकरी ग्राहक, पत्रक आणि बी-बियाणे रासायनिक खते असे अनेक विषयांच्या तज्ज्ञांनी राष्ट्रीय ग्राहक प्रबोधिनीच्या अभ्यासक्रमात काय अंतर्भूत आहे याचा विचार केला आहे. सर्व थरातील मंडळींना विविध क्षेत्रातील ग्राहकांना अत्यंत उपयुक्त माहिती दिलेली आहे. विभाग ४ मध्ये अशी पत्रे असे आवाहन आणि एकूण छोटी छोटी सात प्रकरणे यांतूनही विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व जाणकार मंडळींनी संस्थेला लिहिलेली पत्रे, गुणगौरवपर लेख इ. भरगच्च माहिती दिलेली आहे. विभाग ४ मध्येच, सुरूवातीस केलेले आवाहन अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणतात, ''माझ्या साधकांनो, गरूडाची आकाशभरारी पाहून चिमण्यांनी उडावयाचे सोडून दिले, असे कधी होईल का? मग मी साधा माणूस मी काय करणार? असे म्हणून केवळ मनोरथी बनू नका.'' मी आणि माझे चा कोष फोडून स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी तुमच्या परीने तुम्हांला कार्याची क्षेप घेऊन कर्मरथी व्हायला हवे. 'आकाशी झेप घे पाखरा, सोडी सोन्याचा पिंजरा' या गीताचे शब्द तुमच्या जाणिवेत घुसू द्यात. विचारामध्ये कृती घातल्याशिवाय जीवनज्योतीचा प्रकाश पडणार नाही. देश तुमची आणि तुमच्या सारख्या दीपमाळेची वाट पाहात आहे.

अशा या अपूर्व ग्रंथातील पान अन् पान वाचनीय व जीवनात अत्यंत उपयोगी पडणारे आहे. सर्वांनी तो जरुर वाचावा, संग्रही ठेवावा. सर्व ग्रंथालयांना खास विनंती की

अंगात जुना सदरा असला तरी चालेल, पण नवे पुस्तक विकत घ्या. - रॉबर्ट हेन्रीक

त्यांनी हा ग्रंथ जरूर आपल्या ग्रंथालयासाठी घ्यावा. ग्राहक संघटना स्थापन करणाऱ्या समाज सेवींना तो खास करून विशेष उपयोगी पडणार आहे. सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनीही या ग्रंथराजातील तत्त्वे आचरावीत. स्वातंत्र्य सेनानी, ग्राहकतीर्थ श्री. बिंदुमाधव जोशीयांचे सारे ऋषितुल्य जीवन आणि कार्य सूर्यासारखे तेजस्वी आहे. प्रत्येकाने त्यापासून स्फूर्ती घेऊन अवघ्या भारतासाठी कार्यरत व्हावे ही इच्छा. श्री. बिंदुमधव जोशी यांनी अतुलनीय कामगिरी केलेली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. राष्ट्रीय ग्राहक प्रबोधनाने हा ग्रंथराज प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे ही अभिनंदन.

---

**'असा घडला भारत', या ग्रंथास राष्ट्रीय चळवळीवरील प्रथम पुरस्कार**

स्वातंत्र्योत्तर भारताची ६५ वर्षांची वाटचाल उलगडणारा हा महदग्रंथ आहे. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, विज्ञान, कलाक्रीडा, संस्कृती, उद्योग, पायाभूत सेवा, शिक्षण, आरोग्य अशा विविध क्षेत्रात घडलेल्या महत्त्वपूर्ण घटना व घडामोडींतून घेतलेला स्वतंत्र भारताचा वेध या ग्रंथात आहे. जुनी पिढी, नवी पिढी, तरुण पिढी या सर्वांसाठी हा एक रंजक खजिना आहे.

मोठ्या आकाराची (९''ह्न११.५'') ९२४ पाने असलेला हा ग्रंथ आहे. (भव्य निर्मिती मूल्यं, हार्डबाऊंड असलेला हा एक उत्कृष्ट ग्रंथ आहे. अवघ्या ९० दिवसात ३०० प्रतींची विक्री झालेली आहे. त्याची तिसरी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झालेली आहे. संपादकद्वय आहेत श्री. सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर, कुमार केतकर यांची प्रस्तावना आहे. किंमत रु. १५००/- आहे. रोहन प्रकाशन ५ व ६ 'धवलगिरी', शनिवारपेठ, पुणे-३० (फोन.: पुणे-०२०-२४४८०६८६ व मुंबई-०२२-२३८९२३७८) प्रकाशन संस्थेचा पत्ता सुरुवातीस दिलेला आहे. प्रत्येक घरात, शाळा, कॉलेजात, लायब्ररी व सर्व प्रकारच्या संस्था यांच्या संग्रही असलाच पाहिजे असा हा ग्रंथ आहे. प्रकाशक व संपादक द्वयांचे मनःपूर्वक अभिनंदन.

नुकताच या ग्रंथास राष्ट्रीय पातळीवरील (प्रादेशिक वर्गवारी) सर्वोत्तम ग्रंथाचा पुरस्कार मिळालेला आहे. प्रकाशक व लेखक यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

---

**'त्यांनी उभी केलेली माणस' (ले. वासंती देशपांडे) – एक अपूर्व पुस्तक**

आज एका अपूर्व पुस्तकाची ओळख आपल्याला करून देणार आहे. पुस्तकाचे नाव आहे. 'त्यांनी उभी केलेली माणसं'(ले. वासंती देशपांडे, ७/८ बी, निवास प्लाझा, शरणपूर रोड, नाशिक, दूरध्वनी - ९३२६५६६३९०, आवृत्ती एक-मे २०११, पृ.२३७ मुल्य रु.२००/-, प्रकाशक-अक्षर मानव प्रकाशन, ९५९, पवनपुत्र, दुसरा मजला, शिवाजी रस्ता, राष्ट्रभूषण चौक, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२, दूरध्वनी-०२०-३०४२६६७९)

**महत्त्वाचा दस्तऐवज**

हे अशा प्रकारचे पुस्तक कदाचित मराठीतील पहिलेच असावे! जगभर अनेक लेखक कथा-कादंबऱ्या लिहित असतात. त्यांत ती माणसं काय जगतात आणि त्या माणसांनी काय जगाव हे लिहित असतात. माणसांच्या जगातील भूतकालीन, वर्तमान कालीन नोंदी आणि भविष्यकालीन स्वप्न म्हणजे कथा-कादंबऱ्या, या नोंदी आणि स्वप्नांसाठी आपल्या लिहिण्यात पात्रांच्या रूपात अनेक खरी-खोटी माणस उभी करतात. ही पात्र म्हणजे माणसांच्या जगात कसं जगावं याची निदर्शक असतात. अशा अनेक लेखकांची पुस्तकं अव्याहतपणे वाचत राहून, त्यांतल्या लेखकांनी उभ्या केलेल्या माणसांशी (पात्रांशी)

---

माणूस किती मिळवितो त्यापेक्षा किती देतो यावरच त्याची श्रीमंती ठरते. - हेन्री बीच

प्रत्यक्षातल्या मानवी जगण्याचा संबंध जोडून दाखविण्याचा ललित प्रयत्न म्हणजे हे पुस्तक. यात जगातल्या अनेक पुस्तकांमधील अनेक पात्र आहेत आणि नुसती पात्रीच नाहीत तर त्यांची संक्षिप्त कथानकंसुद्धा आहेत आणि त्या दोन्हीतून मानवी आयुष्याबद्दल शोधल जाणारं; चिंतनशील भाष्यसुद्धा आहे. समाजमनावर प्रभाव टाकणाऱ्या जगभरच्या लेखकांनी आपल्या लिहिण्यात निर्माण केलेली पात्र (माणसं) प्रत्यक्ष जगण्यातल्या माणसांशी ताडून पाहण्याचा अतिशय रम्य पण विचारी खेळ म्हणजे हे पुस्तक. गंमत म्हणजे, यातून त्या लेखकांच्या स्वतःच्या वृत्ती–प्रवृत्तीसुद्धा लक्षात येतात. साहित्याच्या दृष्टीनं हे पुस्तक म्हणजे महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

मलपृष्ठावरील (ब्लर्ब) हा उतारा म्हणजे या पुस्तकाचं सार आहे. लेखिकेनं ते अत्यंत समर्पकरित्या सांगितले आहे.

लेखिका आपली 'भूमिका' सांगतांना म्हणते, 'साहित्याबद्दल विचार करताना, नेहमीच हे प्रश्न विचारले जातात की, साहित्याने माणसाला काय दिलं? किंवा साहित्य ही खरोखरोच माणसाची गरज आहे का? या प्रश्नांची उत्तरे वेगवेगळी येतील. पण त्यात प्रत्येक उत्तराचा तपशील वगळता, साहित्याबद्दलची कृतज्ञता, तपशिलाचा फरक वगळता, साहित्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त झालेली असेल.

कधी एखाद्या कादंबरीत वातावरण एवढे जिवंत होऊन येते, ते वर्णन असते, तो परिसर, तेथील सरोवरे, रात्री, झाडे, रहिवासी, त्यांच्या जगण्याच्या प्रेरणा हे सारे मिळून असे गडद रसायन आपल्या मनात भिनते की आपल्या मनाचाच एक भास होऊन जातो. उदा. विभूतिभूषण बंदापाध्यायांची 'आरण्यक' ही कादंबरी. या कादंबरीतले प्रमुख पात्र म्हणजे तेथील जंगल आहे. मानवी व्यक्तिरेखा झाकून टाकणारे कधी सुंदर, कधी गूढ क्वचित उद्दाम!

'कधी एखाद्या साहित्यकृतीत 'काळ' हा प्रभावी व्यक्तिमत्त्व होऊन आलेला असतो. उदा. बंकिमचंद्रांची 'आनंदमठ' ही कादंबरी. स्वातंत्र्य गमावलेला, संभ्रमात सापडलेला तो काळ आणि तरीही अंतरात स्वातंत्र्याची स्फुल्लिंगे पेटलेला तो काळ! या काळापुढे व्यक्तिरेखा गौण असतात किंवा काळाच्या रेट्याप्रमाणे त्या प्रभावी वा निष्प्रभ ठरतात. ते त्यांनाही ठाऊक असते. पण त्यांना त्यांची फिकीर नसते.'

**पुस्तकाचे अंतरंग**

या पुस्तकांत जगातल्या ५२ पुस्तकांतील (कथा–कादंबऱ्या) महत्त्वाची पात्रं त्यांना (लेखिकेला) कशी भावली याचे प्रभावी चित्रीकरण त्यांनी केलेले आहे. त्यात अनेक भारतीय (विशेषतः मराठीतील) व परदेशी लेखक आहेत. त्यात मराठीतील श्रेष्ठ कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या ५ कथा आहेत. सर्वश्री द. मा. मिरासदा, गो. नी. दांडेकर, अनिल बर्वे, त्र्यं. वि. सरदेशमुख, रणजित देसाई, दि. बा. मोकाशी, य. गो. जोशी, महादेव शास्त्री जोशी इ. च्या कथांनी त्यांना कसे भारून टाकले त्यासंबंधीचे अवीट गोडीचे वर्णन त्यात आलेले आहे. पाश्चात्य जगातील अंतोन चेकॉव्ह, ऑस्कर वाईल्ड, जॅक लंडन, हेन्री गार्डन इ. बी व्हाईट इ. बंगाली व उर्दू भाषेतील अव्वल साहित्यकारांच्या कथा कादंबऱ्याही आहेत. (त्यात त्या त्या पुस्तकांचे काही अनुवादही आहेत.)

प्रत्येक कथेसंबंधी लिहिताना लेखकाची थोडक्यात ओळख, कथेचा काळ व पार्श्वभूमी, तयांना भावलेलं त्यातलं पात्र, त्याची परिस्थिती आणि त्या प्राप्त परिस्थितीत त्यांने दिलेला लढा वा टक्कर हे सारे मंत्रमुग्ध करणारे आहे. ते एकदा वाचून आपले समाधान होत नाही. पुनः पुन्हा वाचावेसे वाटते. मुळात अनेकजण असे प्रभावी साहित्य वाचतच असतात. पण काही काळानंतर ते आपल्या स्मरणातून जाते. (काही वाचक याला जरूर अपवाद

क्रांती ही तत्त्वांमुळे घडून येते. बंदुकांमुळे नव्हे! क्रांती प्रथम डोक्यात होते. मग कृतीत उतरते – मॅझिनी

आहेत. त्यांच्या लक्षात साऱ्या गोष्टी राहतात. अभ्यास वाचक आणि समीक्षक यांनी तर अशी पुस्तके अनेक वेळा वाचलेली असतात. त्यातील कित्येक प्रसंग त्यांना मुखोद्‌गत असतो. पण असे वाचक टक्केवारीने फार थोडे असतात! मात्र सर्वसाधारण वाचक पुस्तकातील वर्णन वाचताना बेहोष होतो. त्याला त्यावेळी आपण कधीकाळी ही कथा-कादंबरी वाचली होती याचे भान येते व तो आनंदाने मोहरून जातो.) लेखिकेने 'निरोप!' या प्रकरणात म्हटलेच आहे की 'जी.ए.कुलकर्णींच्या 'इस्किसार'या कथेपासून इस्मत चुगताईंच्या 'बच्छो फुफी' पर्यंत अनेक कथा, कादंबऱ्या आपण वाचल्या. त्या त्या व्यक्तिरेखा परत मला भेटायला आल्या. कुणी लहानपणीच मनोविश्वात ठाण मांडून बसलेल्या, तर कुणी जाणतेपणी मैत्री झालेल्या, पण तरीही हळव्या, दृढ मैत्रीच्या अधिकारी!

या साऱ्या व्यक्तिरेखा इतक्या अस्सल होत्या की, त्या कधी, काल्पनिक वाटल्याच नाहीत. वास्तविक त्या अतिरंजित वाटायला हव्या होत्या; पण त्या तशा वाटल्या नाहीत. कारण वास्तवात आपल्याला काही माणसे अशी भेटतात की, अरे काय माणूस आहे. चोख सोनं; पण ते ऐवढेच न्यून बघा. तेवढे नसते तर माणूस म्हणजे शंभर नंबरी असे आपण म्हणतो आणि बरेचदा साहित्यात अशी माणसे अवतरतात, की त्यांच्यात न्यून जवळजवळ नसतेच म्हणून मग ते आपले आदर्श बनतात. आपण त्यांच्यावर प्रेम करू लागतो, पण बरेचदा साहित्यातही व्यक्ती मनुष्याप्राण्याचे सारे गुणदोष घेऊनच अवतारतात. पण तरीही त्यांचा अभ्यास केल्यावर मन त्यांचा तिरस्कर करू धजत नाही..

---

**'बुक्स ऑन बुक्स'**

प्रसिद्ध लेखक सतीश काळसेकर आपल्या पारितोषिक प्राप्त पुस्तकात म्हणतात, 'Books on Books' या सदरात मोडणारे हे त्यांचे म्हणजे काळसेकरांचे पुस्तक आहे. (अशा पुस्तकांचे प्रमाण इंग्रजी भाषेत फार मोठे आहे. त्यांनी पुस्तकाच्या शेवटी अशा पुस्तकांची यादी दिलेली आहे. त्यात मराठी २६ व इंगजीतील ४६ पुस्तके आहेत. ही यादी परिपूर्ण म्हणता येणार नाही. पण जिज्ञासूंनी/ अभ्यासकांनी ती जरूर वाचावीत. इंग्रजीतील 'पॅशन फॉर बुक्स' संकलन-रॉबिन विट्झ हॅराल्ड ॲन्ड कपलान या पुस्तकाच्या अखेरीस ११३ पुस्तकांची यादी दिलेली आहे.

**श्रेष्ठ मोलाचा हा ग्रंथ आहे.**

सतीश काळसेकर म्हणतात त्या प्रकारचा ('Books on Books') हा प्रस्तुत (त्यांनी उभी केलेली माणसं) ग्रंथ आहे. सोन्याचे मोल लाभलेला हा ग्रंथ प्रत्येक माणसाने अवश्य वाचावाच. साहित्यसंस्थांनी, ग्रंथालयांनी तो अवश्य संग्रही ठेवावा, हे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, शांताराम, चि. वि. जोशी, व. पु. काळे, रमेश मंत्री, दुर्गा भागवत, इ. अनेक दर्जेदार लेखकांच्या पुस्तकांचा उल्लेख या पुस्तकात नाही. पण शेवटी व्यवसायाच्या दृष्टीने पृष्ठ संख्येला मर्यादा आहेतच. असे लेखक गोळा केले तर त्यांची अनेक पुस्तके होऊ शकतील. (इतर भारतीय भाषेतील व पाश्चात्य भाषेतील लेखकांची यादी काढली तर त्यांची शेकडो पुस्तके तयार होतील. तरीही प्रकाशकांना विनंती, त्यांनी अशी पुस्तके काढण्याचा प्रयत्न जरूर करावा. शेवटी प्रकाशक (अक्षरमानव प्रकाशन) आणि लेखिका (वासंती देशपांडे) यांचे मनःपूर्वक अभिनंदन. वासंती ताईंना खास विनंती की त्यांनी भारतांतील व परदेशातील श्रेष्ठ दर्जाचे इतर लेखक निवडून सवडीने त्यांचीही पुस्तके लिहावीत अक्षरमानव प्रकाशन ती अवश्य प्रसिद्ध करील.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

---


माणूस हा नशिबाच्या हातचे बाहुले आहे, असे म्हणण्यापेक्षा नशिब हे माणसाने बनविलेले बुजगावणे आहे, असे म्हणा!- थॉमस कार्लाईल

**ग्रंथ परिचय**

# सद्‌गती - एक वाचनीय कथा संग्रह

*कोकणाच्या ग्रामीण जीवनातील पार्श्वभूमीवरील व्यक्तिचित्रणात्मक कथांचा हा संग्रह आहे. एक उत्तम नवा संग्रह म्हणून सर्वांनीच हा वाचायला हवा - संपादक*

प्रल्हाद आवळसकर यांच्या साहित्यातील 'सद्‌गती' हा चार दीर्घकथांचा संग्रह वाचला. साहित्यिक म्हणून त्यांची लोकांना फारशी ओळख नसली तरी, ठाण्यातील विद्यमान साहित्यिकांत त्यांना फार वरचे स्थान द्यावयास हवे. हार्मोनियम वादक म्हणून त्यांची संगीत विश्वात चांगली ओळख आहे. परंतु 'सद्‌गती' 'ओपी नय्यर आणि मी' हे त्यांचे साहित्य वाचल्यावर त्यांच्या कथा आणि हिंदी चित्रपट गीतांचा अभ्यास आपल्या मनावर दीर्घकाळ ठसा उमटवून जातात.




कोकण आणि कोकणातील माणसे, त्या माणसांची बोलीभाषा, त्यांचे संबंध, चालीरीती, कोकणातील निसर्ग या सर्वांची आठवण मनात खोलवर ठेवून आवळसकर मोठे होत गेले. 'सद्‌गती' या कथा संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे या कथांमध्ये येणारे व्यक्तिचित्रणातील बारकावे. त्या बारकाव्यांतून हळू हळू उलगडत जाणारे कथानक, या कथांची भाषा हे होय! या कथांमधील माणसे इतकी मानवीय आहेत की, त्यांच्या जीवनातील सर्व तपशीलांसह त्या माणसांचा आयुष्यपट एखाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यांसमोर आकार घेत जातो. 'कहाणी कथेकऱ्याची' या शेवटच्या कथेत पृ.१८४ वर भलूनानांचे वर्णन करतांना लेखक फार सुंदर वाक्ये लिहितो ''आयुष्यभर कष्ट उपसलेला, दारिद्र्याशी झगडत आबाळ सहन करत पुढे आलेला माणूस परीस्थिती पालटल्यावर मात्र उपभोग घ्यायची ताकद हरवून बसतो. अकाली थकतो.'' या व अशा वाक्यांतून कोकणातील माणसांचे विश्व आणि व्यक्तिमत्त्व त्यांची जीवन जगण्यातील अजब म्हणता येईल अशी परिस्थिती उलगडण्यातील आवळसकरांची शैली अतिशय हृदयस्पर्शी आहे. कोकणातील भाषा, त्या भाषेचा बाज या सर्वांमधील आवळसकरांची जाण दाद देण्यासारखी आहे. उदा. '....बराबर हाये व्हो, निसता नारळ देऊन कसा भागंल? तेचा देना इव्यस्थित पुरा करायला नकू?...'(पृ.१०) 'बामनाला अख्खा गिलनान रे बयेन. होत्याचा नव्हता केलान' (पृ.११९) 'शेण खायची सवय असणाऱ्याने इतरांना श्रीखंड खायच्या अकला शिकवू नयेत.' किंवा 'ओवाळून टाकावीत इतकी ही वात्रट कारटी! पण चायझो ऽऽ अभ्यासात मास्तरपेक्षाही हुशार (पृ.८५) ''या वाक्यांप्रमाणेच कोकणातील गावांची, गल्ल्यांची नावेही लक्षणीय आहे. आलपाटातली, सुटवंगळा, भूताचा बोळ, गोल तळ्या अलीकडल्या गाडीतळावर नानवडी, निमगाव, देवाघरचा डिजेल, हरमलेला, संकटांच वारूळ फुटलेलं, पाऊसरेघा, पावसकाळ्या मेघांची दाटी, ही शब्दकळा गावांची नावे अस्सल कोकणातील आहे.

आवळसकरांच्या संग्रहातील या चार कथा म्हणजे

'त्याग' हा जीवन मंदिराचा कळस होय. - वि. स. खांडेकर

'सद्गती' 'सुगंधी आप्पा' 'विष्णुपुराण' आणि 'कहाणी कथेकऱ्याची' या आहेत. यांतील व्यक्ती, व्यक्तीच्या संबंधातील इतर व्यक्ती, गावांचे इतर तपशील, गावांचे चित्रदर्शी वर्णन आणि या सर्वांतून उलगडत जाणारे प्रसंग व कथानक मनाला भुरळ घालणारे आहे. या व्यक्तीचे आपापसातील संवाद त्यांच्या वृत्ती प्रवृत्ती आणि त्यांच्या स्वभावातील वैशिष्टचे वाचल्यानंतर उत्तम व्यक्तिचित्रणाचा नमुना अभ्यासावयास मिळतो. किंबहुना शब्दकळा, शैली व व्यक्तिचित्रण ही या संग्रहाची बलस्थाने आहेत. यातील सिनेमॅटीक ढंगामुळे प्रत्येक कथेवर चांगला चित्रपट काढता येण्यासारखा आहे.

कोकण ही पार्श्वभूमी असलेल्या गारंबीचा बापू (श्री. ना. पेंडसे) कोंडुरा (खानोलकर) इत्यादी आपला ठसा उमटवणाऱ्या साहित्य कृती आठवतात. त्यांच्याच रांगेत त्यांच्या इतकी उंची गाठलेल्या अशा कथांचा हा संग्रह आहे. त्यातील प्रत्येक कथा हा आवळसकरांच्या निरीक्षणांचा, जगण्यातील प्रेरणा, यांचा अभ्यसनीय दस्तऐवज आहे. मराठीतील एक उत्तम कथाकार म्हणून मराठी साहित्य विश्वात त्यांना योग्य तो न्याय मिळावा असे हा कथासंग्रह वाचल्यावर वाटल्याशिवाय रहात नाही.

प्रादेशिक कथा, त्यातील जीवनदर्शनाची शैली, त्यातील घटना व ग्रामीण जीवनाचे तपशील यांचा सखोल अभ्यास करावा, इतक्या चांगल्या कथा वाचावयास मिळत नाहीत. ब्रिटन मधील काउंटी तेथील जीवन यांचे सशक्त वर्णन असणारे इंग्रजी कथासंग्रह पाहिल्यावर किंवा मालगुडी डेजसारखे पुस्तक वाचल्यावर हे जाणवल्याशिवाय रहात नाही.

**सद्गती** : **दीर्घ कथासंग्रह** – आवळसकर, प्रल्हाद
**प्रकाशक** – नाशिक, मोनिका प्रकाशन, २०१२
पृ. २०८ मूल्य रु.२१०/–

**– मोहन पाठक**
ठाणे

●●●

## अभिनंदन!

दिशाचे जुने लेखक, वाचक, मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. प्रदीप कर्णिक यांची मराठी ग्रंथ संग्रहालय या शतकोत्तर वाटचाल असणाऱ्या संस्थेच्या मराठी संशोधन मंडळाच्या संचालकपदी नेमणूक झाली आहे, याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.

डॉ. कर्णिक हे रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल असून या क्षेत्रातील त्यांचे योगदान ही अतिशय महत्त्वपूर्ण आहे. 'मराठी ग्रंथसंग्रहालयाचे शैक्षणिक व साहित्य विकासातील योगदान' या विषयावर डॉ. श. रा. गणपुले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विद्यावाचस्पती ही पुणे विद्यापीठाची पदवी संपादन केली. त्यांच्या प्रबंधावर आधारित इंग्रजी ग्रंथ त्यांनी लिहिला असून डिंपल प्रकाशनाने तो प्रकाशित केला आहे.

डॉ. कर्णिक यांचे अनेक विषयांवरील अभ्यासपूर्ण लेख व त्यांच्या नावावर असणारे व प्रकाशक म्हणून प्रकाशित केलेले ग्रंथ यांचे योगदान लक्षणीय आहे. अध्यात्माचा वारसा, साहित्याचा फार मोठा व्यासंग असणाऱ्या डॉ. कर्णिक यांचे अभिनंदन!

**– संपादक**

●●●

www.vpmthane.org/disha/disha_index.htm
या संकेत स्थळावर दिशाचे अंक उपलब्ध आहेत.

# ऑन्टॉलॉजी

*अस्तित्वशास्त्र हा अतिशय गहन विषय असून, या विषयाची ओळख करून देणारा हा प्रास्ताविकपर लेख– संपादक*

## प्रस्तावना

ऑन्टॉलॉजी हा शब्द मूळ ग्रीक 'ऑन्टो' या शब्दापासून बनला आहे. ऑन्टो, म्हणजे 'अस्तित्व'. ऑन्टॉलॉजी म्हणजे अस्तित्वाचा अभ्यास किंवा सिद्धांत होय. ऑन्टॉलॉजीला मेटाफिजिक्स किंवा फर्स्टफिलॉसॉफी अशीही अन्य काही नावे आहेत. ज्यांची व्याख्या सुप्रसिद्ध विचारवंत ॲरिस्टॉटल याने ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात केली होती. अठराव्या शतकात जर्मन शास्त्रज्ञ ख्रिश्चन वॉल्फ याने ऑन्टॉलॉजी या संज्ञेचा प्रभावी वापर केला. त्याच्या मते ऑन्टॉलॉजी हे अस्तित्वाच्या निदर्शकाकडे नेणारे आवश्यक असे सत्य आहे. इमॅन्युअल काट याने त्याच्याच आधारे ईश्वरवादाचा पाया रचला विसाव्या शतकातील मेटाफिजिक्सच्या उदयाने बऱ्याच विचारवंतांना ऑन्टॉजॉजी हा विषय फारच महत्त्वाचा वाटू लागला. या संज्ञेचा सर्वप्रथम वापर रोडॉल्फ गोकल (Radolf Gockel) व जेकब लोर्हार्ड (Jacob Lorhard) या दोन तत्त्वज्ञांनी इ.स.१६१३ मध्ये केला. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशात याचा समावेश इ.स.१७२१ मध्ये झाला.

## व्याख्या

ऑन्टॉलॉजीच्या संदर्भात तत्त्वज्ञान, माहिती तंत्रज्ञान व ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या दृष्टिकोनातून पुढीलप्रमाणे व्याख्या सांगता येतील.

**१. तत्त्वज्ञान** : निसर्गातील अस्तित्वदर्शक घटकांचा अभ्यास म्हणजे ऑन्टॉलॉजी होय.

**२. माहिती तंत्रज्ञान** : विशिष्ट हेतूने रचना केलेली ऑन्टॉलॉजी ही एक तांत्रिक संज्ञा आहे. त्याद्वारे वास्तव किंवा काल्पनिक क्षेत्रातील ज्ञानाचे आराखडे तयार करता येऊ शकतात.

**३. ग्रंथालय आणि माहिती शास्त्र** : विशिष्ट क्षेत्रीय मर्यादित औपचारिक पद्धतीने संकल्पना व त्यांचे आकलन यांचे नातेसंबध दर्शवणाऱ्या संकल्पनांचे सादरीकरण म्हणजे ऑन्टॉलॉजी होय.

म्हणजेच आपण असे म्हणू शकतो की, विशिष्ट ज्ञानक्षेत्राच्या वर्णनाची ऑन्टॉलॉजी ही एक अशी समान शब्दसंपदा आहे की जी मानवाद्वारे नैसर्गिकपणे, तसेच संगणकाच्या उपयोजनाने यांत्रिकपणे वापरली जाऊ शकते.


## अर्थ

ऑन्टॉलॉजीमुळे माहितीचे व्यवस्थापन केले जाते. ज्या अभ्यासकांना एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील माहिती सामायिकपणे वापरण्याची गरज असते. अशांसाठी ऑन्टॉलॉजी ही एक सामायिक शब्दसंपदा आहे. तिच्यामुळे विशिष्ट ज्ञानक्षेत्राशी संबंधित संकल्पना, नातेसंबंध, तसेच अनेक जवळिक साधणारे घटक विशेषत्वाने दर्शवता येतात. याच विशेषत्वाच्या आधारे प्रतिनिधिक शब्दसंपदेला अर्थ दिला जाऊ शकतो. या अंतर्गत, असे निश्चित होते की, सर्व विषयांचा एकमेकांशी नातेसंबंध असतो. ते एकाच ज्ञानाच्या क्षेत्राशी निगडित सर्व बाबींचे सहभागी असतात. त्यामुळे त्यांना समान शब्दसंपदा प्राप्त होते व त्यामुळे त्यांच्यात तुलना होऊ शकते किंवा काही निष्कर्ष काढता येऊ शकतात. म्हणजेच, याचा अर्थ असा

माणसाला स्वतःच्या दोषाची जाणीव होणे, हे त्याच्या शहाणपणाचे पहिले लक्षण आहे –रुदरफोर्ड

की आंबा व सफरचंद यांचा ऑन्टॉलॉजी आराखडा तयार करता येत नाही. कारण त्यांच्या क्षेत्रीय मर्यादा भिन्न आहेत. या दोन्ही गोष्टीत समान संकल्पना किंवा शब्दसंपदा अंतर्भूत नाहीत. ऑन्टॉलॉजी ही संकल्पना वापरायची असेल, नातेसंबंध प्रस्थापित करायचे असतील किंवा दोघांतील साधर्म्य/ वैविध्य यांचे पायाभूत आकलन करून घ्यायचे असेल तर आंब्याची तुलना आंब्याशी करावी लागेल. उदा. हापूस व पायरी किंवा रायवळ.

ऑन्टॉलॉजीमुळे विशिष्ट ज्ञानक्षेत्राचे समग्र आकलन, व्यक्ती किंवा यांत्रिक पद्धतीद्वारे, सहभागाने उपभोगता येते. आकृती क्र.१ पहा. यात लेखक एक व्यक्ती आहे व पुस्तक एक प्रकाशन आहे. एवढाच संबंध दर्शवला नसून, लेखक पुस्तक लिहितो व त्या पुस्तकाला प्रकारणे असतात. इथपर्यंत तो दर्शवलेला दिसून येतो. तसेच, आणखीही पुढे तो वाढवता येऊ शकतो.




**(आकृती क्र. १: विशिष्ट ज्ञानक्षेत्राचे समग्र आकलन)**

**ऑन्टॉलॉजी : विकास व कारणे**

गेल्या काही वर्षांपासून, विशिष्ट क्षेत्र आणि नातेसंबधांतील संबंधांचे विशेषीकरण करणाऱ्या ऑन्टॉलॉजीची जडणघडण, ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळेतील विचारवंतांकडून विशिष्ट क्षेत्रातील तज्ज्ञांच्या संगणकाकडे वळली आहे. संगणकीय माहितीच्या मध्यस्थांना माहितीचा शोध घेताना आकलन होणारी परिभाषा विकसित करण्याची गरज भासू लागली आहे. यासाठी ऑन्टॉलॉजी विकसित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ऑन्टॉलॉजी विकासाची अन्य काही कारणे अशी आहेत.

- सर्वसामान्य अभ्यास किंवा संगणक आज्ञावली मध्यस्थ यांना माहितीच्या आराखड्याबाबतची समान जाणीव अथवा आकलन यांची वाटणी करणे.
- ज्ञानक्षेत्राच्या पुनर्वापराची उपलब्धता मिळवून देणे.
- क्रियात्मक ज्ञानापासून क्षेत्रीय ज्ञान अलग करणे.
- क्षेत्रीय ज्ञानाचे विश्लेषण करणे.

**ऑन्टॉलॉजीची कार्ये**

ऑन्टॉलॉजीची कार्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील घटकांना समान पार्श्वभूती व आकलन क्षमता प्रदान करणे.
२. त्या क्षेत्राशी संबंधित माहितीचा जे अभ्यास करतात त्यांना समान पाया पुरवणे.
३. ज्यांना काही अर्थ प्राप्त होईल, अशा संकल्पनांचा आराखडा तयार करणे.
४. अशा संकल्पनांचा सर्वमान्य असा नातेसंबंध दर्शवणारा मार्ग तयार करणे.


**ऑन्टॉलॉजीच्या पायऱ्या**

ऑन्टॉलॉजी तयार करण्यासाठीच्या पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्यासाठी ऑन्टॉलॉजी तयार करायची आहे ते विशिष्ट क्षेत्र व त्याची व्याप्ती ओळखणे.
२. सध्या वापरात असलेली ऑन्टॉलॉजी पुनर्वापराला उपयुक्त आहे की नाही ते ओळखणे.
३. संबंधित संज्ञा गोळा करणे.
४. संज्ञांची वर्गवारी करणे.
५. या संज्ञांची अंतर्गत रचना (एकास एक नातेसंबंध) तयार करणे.
६. या रचनेचे पैलू ओळखणे.
७. पडताळणी करणे.

### ऑन्टॉलॉजी : समानार्थी संज्ञा

ऑन्टॉलॉजीशी समान नाते सांगणाऱ्या संज्ञा 'डेबोरा मॅक्गिनेस' यांनी त्यांच्या 'ऑन्टॉलॉजी स्पेक्ट्रम' या ग्रंथात सांगितल्या आहेत. उदा. शब्दसंग्रह नियंत्रण, शब्दकुलकोश, वर्गीकरण पद्धती इ. वरवर पाहता त्या सारख्याच वाटतात. परंतु, त्यांच्यात सूक्ष्म असा भेद आहे. उदा. वर्गीकरण पद्धती विषयाचे एकच एक स्थान दर्शवते, शब्दकुलकोश एका विषयाचे अन्य एका विषयाशी नाते दाखवते, तर ऑन्टॉलॉजी एका विषयाचे अन्य अनेक विषयांशी नाते दर्शवते. त्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ. आकृती क्र. २ पहा.




**(आकृती क्र. २ पहा. ऑन्टॉलॉजी : समानार्थी संज्ञा)**

या उदाहरणा A या ठिकाणी उभ्या असलेल्या कुरियर बॉयला विविध ठिकाणी पार्सलचे वाटप करून I या ठिकाणी जायचे असेल, तर माहिती व्यवस्थापनाच्या विविध पद्धतींनुसार त्याला वेगवेगळे पर्याय प्राप्त होतील.

१. वर्गीकरण पद्धती त्याला थेट A ते I हा एक दिशा मार्ग दर्शवेल (एकच एक स्थान निश्चिती), ज्यामुळे तो फक्त I या एकाच ठिकाण पार्सल देईल.

२. शब्दकुलकोश त्याला A-F व F-I असा मार्ग दाखवील (एकास एक नातेसंबंध). ज्यामुळे तो फक्त दोन ठिकाणी पार्सले देईल.

३. ऑन्टॉलॉजी त्याला A-B, B-C, C-E, E-F, F-G, G-H व H-I असा मार्ग दाखवेल (एकास अनेक नातेसंबंध), ज्यामुळे तो जास्त पार्सले देईल.

### ग्रंथालयात वापर

माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऑन्टॉलॉजीचा ग्रंथालयात प्रभावी वापर करता येऊ शकतो. एका उदाहरणाने ही बाब अधिक स्पष्ट होईल. ग्रंथालयात कोणत्या विषयाला अधिक मागणी आहे ते प्रथम पहावे. त्याचा सूक्ष्म स्तरावर शोध घ्यावा. त्यानंतर आपल्या ग्रंथालयात तो विषय समाविष्ट असलेले कोणकोणत्या प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे, याची संगणकाच्या साहाय्याने एक सूची तयार करावी. उदा. ग्रंथ, नियतकालिके, माहितीसंग्रह, ऑनलाईन – ऑफलाईन संदर्भसाधने इ. ही सूची, म्हणजेच त्या विषयाची ऑन्टॉलॉजी होय.

### पुढील अभ्यासासाठी दिशा

वरील त्रोटक लेखात पुढील मुद्दे समाविष्ट करता आले नाहीत. त्यावर स्वतंत्र अभ्यास करणे शक्य आहे. ते मुद्दे असे आहेत.

१. ऑन्टॉलॉजीचे दृष्य प्रारुप (शब्दकोश, विश्वकोश इ. प्रमाणे)

२. वर्गीकरण पद्धती, शब्दकुलकोश आणि ऑन्टॉलॉजी यांचा तौलनिक अभ्यास

३. ऑन्टॉलॉजीसाठी मराठीत परिभाषा.

### सारांश

ऑन्टॉलॉजी ही माहिती व्यवस्थापनाची नव्याने विकसित होत असलेली पद्धती आहे. त्याद्वारे कोणत्याही विषयाचे एकास अनेक संबंध दर्शवता येतात. मूळ मेटाफिजिक्सचा भाग असलेल्या या विषयास ग्रंथालय आणि माहिती शास्त्राने इतर विषयांप्रमाणेच समाविष्ट केले आहे.

## संदर्भ


- Jurisica, Igor, Mylopoulos And Yu, Eric (1999), Using Ontologies for Knowledge Management : An Information System Perspective: Annual Conference of the American Society for Information Science, Washington
- Smith, Baeey (2003), Ontology, In Blackwell Guide to the philosophi of Computing and Information, Oxford, p.1555-166
- www.reference. your dictionary.com Retieved on 26th August 2012.
- www.wikipedia.org/wiki/ontology Retrieved on 26th August 2012.



**– प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये**
ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद सत्र महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व)
smathalyed42@gmail.com


●●●

| | |
|---|---|
| कसेबसे रडत जगण्यापेक्षा | – आनंदाने जगा. |
| नुसतं बघण्यापेक्षा | – निरीक्षण करा. |
| कीव करण्यापेक्षा | – सहानुभूती द्या. |
| नुसतं ऐकण्यापेक्षा | – श्रवण करा. |
| नुसतं वाचण्यापेक्षा | – मनन करा. |
| नुसतं रोप लावण्यापेक्षा | – ते जगवा. |
| भांडण, द्वेष करण्यापेक्षा | – सुख पसरवा. |
| स्पर्श करण्यापेक्षा | – भावना अनुभवा. |
| नुसतं जाणलं असं दाखवण्यापेक्षा | – अंतर्मुख व्हा. |

**– संग्रहातून**

●●●

### व्यावसायिक समाधान व ताण

अध्यापन हा एक सामाजिक व्यवसाय आहे. काही शिक्षक तो आनंदाने, उत्साहाने आपलासा करतात; तर काहीजण इतर आवडीचा व्यवसाय मिळू शकत नाही केवळ नाईलाज आहे म्हणून तो स्वीकारतात. कार्य समाधान हा आपल्या व्यवसायावर परिणाम घडवणारा महत्त्वाचा घटक असतो. कारण तो कार्यक्षमतेवर परिणाम करतो. संस्थेची प्रगती तिच्या कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते, कारण आपल्या व्यवसायातून समाधान मिळवणारा व्यावसायिकच आनंदी असतो व आपले काम कार्यक्षमतेने करतो. विद्यार्थ्यांशी येणारा आंतरव्यक्ती संबंध, सहकाऱ्यांशी येणारा संबंध, व्यवसायाची तुमच्याकडून असणारी अपेक्षा यामुळे पदोपदी आव्हाने उभी असतात. यांचा परिणाम तुमच्या मनावरील ताण वाढण्यात होत असतो. अशा प्रकारचा दीर्घकालीन ताण तुमच्या मानसिक वा शारीरिक आजारपणाचे कारण ठरतो. स्वाभाविकच तुमच्या वर्गातील उपक्रमांवर व अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होऊन तुमच्या व्यावसायिक प्रगतीत, विकासात अडथळे येतात.

व्यावसायिक ताणाचा माध्यमिक स्तरावरील परिणामांचा अवलंबित घटक (डिपेडेंट व्हेरिएबल) म्हणून करण्यात आलेले हे संशोधन आहे.

संदर्भ – Asian Journal of Psycology and Education खंड ४६ क्र. ५–६ (त्रैमासिक) पृ.२९ ते ३२

A story of Job Satisfaction and Occupational stress among सेकंडरी स्कूल टीचर्स – बी. शर्मा, पुंज

●●●

सुंदर सजविलेल्या खोल्या आणि ऐषारामी फर्निचर वापरणाऱ्या लोकांच्या मेंदूत विचार करण्याची कुवत बहुधा टिकून रहात नाही.–जर्मन कवी गटे

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर

- Maths Talent Search परीक्षेचा निकाल अलिकडेच जाहीर झाला. इ. ६, ८ व ९ वीचे एकूण १८ विद्यार्थी बसले. कु. ओजस अशोक मेंगडे हा गुणवत्ता यादीत १३६ वा आला.
- दि. ५/८/१३ व १०/८/१३ रोजी वंदना शिंदे यांनी अंधश्रद्धा निमूर्लनाचा कार्यक्रम सादर केला.
- दि. ७/८/१३ रोजी 'समर-एक संघर्ष' हा शैक्षणिक चित्रपट श्रीगणेश शैक्षणिक संस्था विरार, यांच्या मार्फत दाखविण्यात आला.
- प्रारंभ कला ॲकॅडमी प्रस्तुत कै. सौ. कमल भालेराव स्मृती प्रीत्यर्थ नाट्यछटा स्पर्धा रविवार दि. २५.८.१३ झाली.



**नाट्यछटा स्पर्धा प्रथम क्रमांक कु. ऋचा जोशी व कु. यश चिंदरकर, संचालिका अरुंधती भालेराव यांच्यासोबत मान्यवर परीक्षक व विजेते**

इ. ३ री ते ६ वीच्या लहान गटात कु. ऋचा योगेश जोशी व इ. ७ वी ते १० वीच्या मोठ्या गटात कु. यश धोंडू चिंदरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

कु. भावेश कर्णिक इ. ९ वी याने जिल्हा स्तरावर आंतर शालेय बुद्धिबळ स्पर्धेत पहिल्या पाचमध्ये क्रमांक पटकावला व तो आता मुंबई विभागातून खेळण्यासाठी पात्र ठरला आहे.

## जोशी बेडेकर महाविद्यालय

मुंबई विद्यापीठाच्या अनुषंगाने आयोजित ४६ व्या युथ फेस्टिवल २०१३ च्या झोनल राऊंडमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भरघोस यश प्राप्त झाले. ठाणे विभागात झालेल्या या महोत्सवात एकूण २७ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, त्यापैकी एकूण २३ स्पर्धांमध्ये महाविद्यालयाला यश प्राप्त झाले. पारितोषिक प्राप्त स्पर्धा व विद्यार्थ्यांची नावे

| थेटर | पारितोषिक |
|---|---|
| One Act Play Gr. A | प्रथम |
| Skit Gr. A | द्वितीय |
| Skit Gr. C | द्वितीय |
| Mono Acting Gr. A | उत्तेजनार्थ-श्रेयस राजे |
| One Act Play Gr. C | प्रथम |
| Mono Acting Gr. C | प्रथम – तृप्ती गायकवाड |
| Mime | द्वितीय |

**संगीत**

| | |
|---|---|
| Indian Classical Vocal | द्वितीय-सिद्धी शिरोडकर |
| Indian Light Vocal | प्रथम-अनघा पुराणिक |
| Indian Group song | तृतीय |
| Western solo | प्रथम-क्रिस्टल सलडना |
| Western Group Song | द्वितीय |

शहाणी माणसे घड्याळ किंवा ज्ञान यांचा शोभेसाठी उपयोग करीत नाहीत.

**नृत्य**

| | |
|---|---|
| Indian Classical Dance | प्रथम – पल्लवी लेले |
| Folk Dance | तृतीय |

**Literary**

| | |
|---|---|
| Elocution Gr. A. | द्वितीय–किन्नरी जाधव |
| Debate Gr. A. | प्रथम |
| Elocution Gr. A. | प्रथम – रॉयस्टन डायस |
| Debate Gr. B | द्वितीय |

**Fine Art**

| | |
|---|---|
| Collage | द्वितीय–ऋतुजा गवांडे |
| Clay Modeling | प्रथम–मयूर तायडे |
| On the spot painting | द्वितीय–मयूर तायडे |
| Rangoli | प्रथम–अश्विनी शर्मा |
| Catooning | प्रथम–समिधा घाग |

**संस्कृत विभाग**

महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे २६ ऑगस्ट २०१३ रोजी संस्कृत-दिन-उत्सव साजरा करण्यात आला. विद्याविहार, सोमय्या महाविद्यालयातील संस्कृतीपीठम्च्या विभागाध्यक्षा डॉ. ललिता नामजोशी, तसेच संस्कृतभारती कोंकण प्रांताचे संघटक मंत्री श्री. सचिन कठाळे याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले, तसेच या उत्सव प्रसंगी विद्यार्थ्यांनी संस्कृतमधून गीत, नृत्य, नाटक इत्यादी विविध कार्यक्रम सादर केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. भिडे या प्रसंगी उपस्थित होत्या.

**Scholar's Academy**

Scholar's Academy अर्थात् महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणारे माध्यम होय. या अंतर्गत प्राध्यापक आणि शिक्षक यांच्यात ज्ञानपर विषयांवर साधक-बाधक चर्चा झाली. चर्चेचे विषय पुढीलप्रमाणे होते.

१. Qualities of a Scholar
२. Accident of Sindhu-Rakshak submarine
३. Assasination of डॉ. नरेन्द्र दाभोळकर

महिन्याच्या प्रत्येक सोमवारी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते.

**वाणिज्य विभाग**

वाणिज्य विभागातर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास मिठीबाई महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. पराग आजगांवकर यांच्या अतिथी भाषणाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानास विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

**विद्यार्थी मंच**

या समितीतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विद्यार्थ्यांसाठी श्रीमद् भगवद्गीतेवर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानास विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला.

**शिक्षक अकादमी**

या समिती तर्फे 'Technology of Future - Present - Past' या विषयावर डॉ. अच्युत गोडबोले यांचे प्राध्यापकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्राचार्या डॉ. शकुंतला यांचे मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**व्यास सभा**

महाविद्यालयातील व्याससभे अंतर्गत महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी नवनवीन विषयांवर प्राध्यापकांची साधक-बाधक चर्चा होत असते. ज्वलंत विषयाधारित ही चर्चा अतिशय माहितीपूर्ण ठरते. 'रॅगिंग' या विषयावर प्राध्यापकांमध्ये सलग दोन शुक्रवार ही चर्चा झाली. त्यामुळे अनेक मुद्द्यांवर प्रकाश पडला.

## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१. अभिरूप खटला स्पर्धा

पी.ई.एस्. विधी महाविद्यालय, दादर, मुंबई यांनी ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी 'अभिरूप खटला' स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये व्ही. पी. एम्स्. टी. एम्. सी. विधी महाविद्यालयाच्या अंजली पंडित, सुमित जाधव व संदीप गुंजाळ या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेमध्ये अंजली पंडित यांना सर्वोत्तम वक्त्याचे पारितोषिक मिळाले.

२. बॉम्बे लॉयर असोसिएशने २३ ऑगस्ट, २०१३ रोजी 'पोलिसांच्या अटक करण्याच्या अधिकाराचा वापर व गैरवापर आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यावर गदा' या विषयावरील व्याख्यानासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी हजर होते. या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. एस. सी. धर्माधिकारी, ज्येष्ठ वकील श्री. राम जेठमलानी, श्री. श्रीकांत भट व श्री. अशोक मुंदरगी हे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते.

३. शासकीय विधी महाविद्यालय व Clinical Legal Research & Education Institute यांनी Clinical Legal Education & Advocacy Skills या विषयावर दिनांक २२ ते २५ ऑगस्ट, २०१३ या दरम्यान कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये राजेन्द्र रावराणे, संतोष गिरी इ. विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४. वि.प्र.मं.च्या परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने दिनांक २९, ३० व ३१ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या सर्व प्राचार्यांच्या सभेमध्ये सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थिती नोंदविली. डॉ. विजय बेडेकर यांचे ''पाश्चात्य देशातील संस्कृत भाषेचे शिक्षण'' ह्या विषयावरील व्याख्यान दिनांक २९ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ ते ८.३० या वेळेत नाना फडणवीस सभागृह, वेळणेश्वर येथे झाले.

५. दि. १२ ऑगस्ट, २०१३ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे विषय – १) माझे प्रेरणादायी स्वातंत्र्य सेनानी २) आपली लोकशाही निष्कामी ठरतेय का?

परीक्षक म्हणून या स्पर्धेसाठी प्रा. मनीषा वाघ व प्रा. प्रॉस्पर डिसोजा यांनी काम पाहिले.

**विजेते**

**इंग्रजी** – १. रंजनी कृष्णन – द्वितीय वर्ष
२. स्वाती बाळ टेंबे – द्वितीय वर्ष
३. आकाश वारंज – प्रथम वर्ष

**मराठी** – १. दशरथ उबाळे – प्रथम वर्ष
२. राहुल वासनीक – प्रथम वर्ष आणि
कृष्णा कामत – द्वितीय वर्ष

६. दि. १६ ऑगस्ट या दरम्यान प्रथम वर्ष विधी विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेचे विषय – १. राजकीय पक्ष माहिती अधिकाराच्या कक्षेत असावेत की नसावेत.

२. ग्लोबलाझेशन – शाप की वरदान

सोळा विद्यार्थ्यांनी नावे दिली आणि त्यातून दहा विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले. स्पर्धेचे परीक्षक श्री. जयेश गोपाळ गोखले व कु. आदिती आठवले हे होते.

**पारितोषिक विजेते**

इंग्रजी – १. शिखर माहेश्वरी
२. आकाश वारंज
३. मंदार चौकर

मराठी – १. अनिल फड

---

स्वार्थ हा असा एकच दुर्गण आहे की, तो दुसऱ्याच्या ठिकाणी असलेलाही आपल्याला सहन होत नाही.

७. उल्हासनगर येथील एन. जी. विधी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातून कु. कृष्णा कामत व रंजनी कृष्णन यांनी सहभाग घेतला. यामध्ये कु. रंजनी कृष्णन हिला उत्कृष्ट वक्त्याचे सिल्व्हर मेडल मिळाले.

८. दि. २१ आणि २२ ऑगस्ट रोजी साक्षीदार तपासणीचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. तृतीय वर्ष (विधी) विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये श्रीविद्या जयकुमार यांनी भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदींवर चर्चा केली. प्रा. मनोज भट आणि प्रा. शेख सर यांनी साक्षीदार तपासणी उलट तपासणी आणि फेर तपासणी यांचे प्रात्यक्षिक मुलांना करून दाखविले. ज्यावेळी साक्षीदार होस्टाईल होतो त्यावेळी घेण्यात येणारी तपासणी ही यावेळी घेण्यात आली. विद्यार्थ्यांना वारंवार याचे धडे देण्यात आले आणि त्यांनी खूप उत्साहाने यामध्ये सहभाग नोंदविला.

९. विद्यापीठ युवा महोत्सव – प्रा. मिथुन बनसोडे यांनी शिक्षक संयोजक म्हणून युवा महोत्सवामध्ये काम पाहिले. या महोत्सवासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पुढील स्पर्धांमध्ये भाग घेतला.

१. शास्त्रीय संगीत –लाईट व्होकल–कु. मधुरा देशपांडे – द्वितीय वर्ष विधी

२. वकृत्व स्पर्धा – आकाश वारंज – प्रथम वर्ष विधी

३. वादविवाद स्पर्धा – कु. रंजनी कृष्णन)<br>कु. कृष्णा कामत) द्वितीय वर्ष विधी

या महोत्सवामध्ये वकृत्व आणि वादविवाद स्पर्धेमध्ये आपले विद्यार्थी झोनल फेरीसाठी पात्र होऊन त्यांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली आणि अंतिम फेरीमध्ये वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने चौथा क्रमांक मुंबई विद्यापीठामध्ये झालेल्या स्पर्धेत मिळवला.

**अंतिम फेरीचे विषय**

**वक्तृत्व** – भारतातील सुमार राजकारण आणि सामाजिक आणि आर्थिक विकासाला मारक आहे.

**वादविवाद** – शिक्षणाचे खाजगीकरण भारतासाठी चांगले आहे का?

## डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**राष्ट्रीय विपणन संमेलन २०१३(National Marketing Summit 2013)**

२०१३–२०१४ या शैक्षणिक वर्षातील आमचे पहिले राष्ट्रीय संमेलन Advertising, Branding And Promotion या विषय सूत्रावर आधारित होते. सरस्वती वंदने नंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संमेलनाच्या विषय सूत्रावर आधारित माहितीपर Opening Video च्या प्रक्षेपणाने संमेलनाची सुरुवात करण्यात आली. संचालक डॉ. अमित ओक यांच्या स्वागतपर भाषणानंतर डॉ. प्रभाकर केळकर (अधिष्ठाता) यांनी डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेत आयोजित केल्या जाणाऱ्या या संमेलनाचे महत्त्व /उद्देश व्यक्त करून जाहिरात क्षेत्र व प्रसिद्धी माध्यमे यात इंटरनेटच्या प्रभावामुळे जाहिरात करण्याच्या पद्धतीत झालेले आमूलाग्र बदल आणि संमेलनाचा विषय या संबंधी आपले विवेचन सादर केले.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात प्रमुख अतिथी श्री. नितीन भागवत (Exec.Dir & CEO at Asterii Analytics) यांनी आपल्या बीज भाषणात 'जाहिरातींचे भविष्य' या विषयावर आपली मते व्यक्त केली. Social media (Face Book, Twitter इत्यादी) मधून उपलब्ध होणारा माहितीचा मोठा साठा आणि या नव्या माध्यमाचा AIDA या जाहिरातीच्या जुन्या प्रारूपावर झालेला परिणाम आणि "See - Compare - Buy" 'पहा – तुलना करा– मग खरेदी करा' या नव्या प्रारुपाचे आगमन या बदलाचे

महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले. तसेच या Social media वरील अभिप्रायांवर वाढत जाणारा ग्राहकांचा विश्वास, इंटरनेट आणि Social media या वर सहज आणि तत्काळ उपलब्ध होणारी माहिती व त्यामुळे फसव्या किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिराती करून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उद्योग संस्थांवर आलेले प्रतिबंध या नवीन प्रवाहाबद्दलही त्यांनी श्रोत्यांना माहिती दिली. त्या बरोबरच या माहितीच्या उपलब्धतेमुळे उद्योजकांना उत्पादनाच्या किमती आणि इतरही बाबीबद्दल ठेवावी लागणारी पारदर्शकता, crowd-sourcing यासारख्या नवीन संकल्पनांची माहितीदेखील त्यांनी सांगितली.

त्यानंतर दुसरे वक्ते श्री. रंजू मोहन (Business Head, JK ansell, Directo (S&M) South East Asia, Ansell) यांनी संमेलनाच्या विषय सूत्राशी संबंधित त्यांचे अनेक व्यवहारिक / व्यवहार्य अनुभव कथन करून या विषयाबद्दल आपली मते श्रोत्यांसमोर मांडली. तसेच co-branding, branding through sustainability या संकल्पनांची माहिती देखील त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सरसंचालक) यांनी संमेलनाच्या संदर्भात जाहिरात या विषयावर केलेल्या सादरीकरणात अनेक जाहिरातीच्या चित्रफिती दाखवून व त्यातील महत्त्वाच्या मुद्द्यां संदर्भात एक जागरूक ग्राहक बनण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर श्री. अलन कोलासो (Secretary General of ASCI) यांनी देखील जाहिराती संदर्भात नियम, अटी, कायदा इत्यादी महत्वाच्या मुद्द्यासंदर्भात अनेक चित्रफिती दाखवून उपयुक्त माहिती दिली. भारतात ASCI ही संस्था यासाठी कशा प्रकारे कार्यरत आहे अणि वर्षाला सुमारे ५ लाखाहून अधिक जाहिराती या संस्थेतर्फे कशाप्रकारे नियमित केल्या जातात इत्यादी बद्दल महत्वपूर्ण माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

संमेलनातील दुसऱ्या सत्रात मुद्रण व्यवसाय किंवा वृत्तपत्र व्यवसायातील जाहिरात या विषयावर श्री. अमित काबरे (General Manager, Midday infomedia) यांनी त्यांच्या वृत्तपत्रासाठी नवनवीन प्रकारच्या जाहिराती; जसे Party Guide Special, Hit List Broadsheet, Text Wrap Innovation, polybag innovation इत्यादी कशा तयार केल्या प्रसिद्ध केल्या याबद्दलचे आपले अनुभव श्रोत्यांना सांगितले, तर श्री. निखिल बल्लाळ (Executive Editor, at Thane Vaibhav) यांनी त्यांचे स्थानिक वृत्तपत्र चालवताना; नामांकित राष्ट्रीय दैनिके आणि अंकित (डिजिटल) माध्यमे या दोन मोठ्या क्षेत्राचे आव्हान कसे पेलले आणि त्यासाठी जाहिराती संदर्भात त्यांनी कोणत्या नवनवीन योजना राबवल्या याबद्दलचे त्यांचे अनुभव आणि मते त्यांनी श्रोत्यांपुढे मांडली.

आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**राष्ट्रीय विपणन संमेलन २०१३(National Marketing Summit 2013)**

'HR Challenges - Global Perspectives' या विषय सूत्रावर आधारित या वर्षीच्या राष्ट्रीय मानव संसाधन संमेलनाची सुरुवात संचालक डॉ. अमित ओक यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. डॉ. प्रभाकर केळकर (अधिष्ठाता) यांनी संमेलनासंबंधी आपल्या विवेचनात मानव संसाधन विभाग हा कोणत्याही संस्थेचा एक महत्त्वाचा आणि अत्यावश्यक विभाग असल्याचे सांगून संमेलनाच्या विषयासंदर्भात आपले विवेचन सादर केले.

संमेलनाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती अनुपमा वैद्य (Vice President, HR, Grindwell Norton, Saint - Gonain Group) यांनी आपल्या बीज भाषणात सांगितले की आजच्या स्पर्धेच्या जगात तरुण पिढी खूप महत्वाकांक्षी आहे आणि त्यामुळे खूप सहजतेने आणि वारंवार ती नोकऱ्या बदलत असते. पण त्यामुळे ती आपल्या

कामाबद्दलची निष्ठा मात्र गमावते आहे. कर्मचाऱ्यांमधील क्षमतांच्या विविधतेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की उद्योग संस्थांनी एक आनंदी कार्यक्षेत्र उपलब्ध करून देऊन कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, तसेच लवचीक किंवा सोयीस्कर कामकाजाच्या वेळा, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयीन किंवा व्यावसायिक आणि वैयक्तिक किंवा घरगुती जबाबदाऱ्या या दोहोंमधील तोल सांभाळण्यासाठी मदत करणे; अशा काही नवीन पद्धती स्वीकारून मानव संसाधन विभागाने कर्मचाऱ्यांना त्यांचे कार्यक्षेत्र न्याय्य आणि सुरक्षित कसे वाटेल याकडे लक्ष दिले पाहिजे.

संमेलनातील दुसऱ्या वक्त्या डॉ. छाया शास्त्री यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की आजकाल मानव संसाधन विभागातील व्यक्तींना भावना प्रधान राहून चालणार नाही. एखाद्या पदासाठी योग्य कर्मचाऱ्याची निवड करताना अनेक वेळा कणखर निर्णय घेणे जरुरीचे असते कारण हा निर्णय त्या व्यवसाय संस्थेच्या भविष्यातील विकासावर परिणाम करणारा / प्रभाव पडण्यास कारणीभूत ठरू शकतो. तुमचे शारीरिक स्वरूप, संवाद कौशल्य, निरीक्षण कौशल्य, निर्णय क्षमता या सर्व गोष्टी व्यावसायिक क्षेत्रात नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात असेही त्यांनी यावेळी सांगितले.

त्यानंतर श्री. नरेंद्र लिमये (Sr. Manager, HR-Head, Bank of India) यांनी प्रामुख्याने राष्ट्रीय कृत बँकामधील कर्मचाऱ्यांची भरती आणि निवड प्रक्रिये संदर्भात माहिती सांगितली. यामध्ये निवड प्रक्रियेसंबंधीचा इतिहास, पारंपरिक पद्धतीने घेतल्या जाणाऱ्या बँकांच्या परीक्षा, काळानुसार परीक्षा पद्धतीमध्ये झालेले बदल, तसेच बँकींग क्षेत्रातील भरती संदर्भात भेडसावणाऱ्या समस्या इतयादी संदर्भात त्यांनी आपले विवेचन सादर केले.

त्यानंतरचे वक्ते श्री. संजीव पारकर Director Human Capital, **Pricewaterhouse Coopers** (PWC) Diversity & Inclusion (Workforce Diversity) या विषयावर सादरीकरण करून आपली मते मांडली यामध्ये विविधतेचे प्रकार त्याचे जागतिकीकरणा संदर्भात महत्त्व इत्यादी बाबत थोडक्यात चर्चा केली आणि शेवटी (PWC) येथील काही प्रचलित सुविधा जसे Spouse Club, भाषा प्रशिक्षण, गर्भवती महिलांसाठी Cab सुविधा, घरून काम करण्याची सुविधा, सोयीस्कर कामाच्या वेळा, शैक्षणिक सुट्ट्या इत्यादीबद्दल त्यांनी माहिती दिली.

संमेलनाचे शेवटचे वक्ते श्री. नीलेश केळकर (General Manager, Smarter Building & Smarter Cities, IBM India Pvt. Ltd.) यांनी प्रामुख्याने अंकिक (Digital) माध्यम आणि मानव संसाधन या संदर्भात सादरीकरण करून या माध्यमामुळे या क्षेत्रात निर्माण झालेल्या आधुनिक पद्धती, प्रवाह इत्यादींबाबत माहिती सांगितली. त्यांच्या मते या माध्यमामुळे आता व्यवस्थापन संस्थेतील कोणतेही काम online प्रक्रियेद्वारे करता येते जसे कर्मचाऱ्यांची हजेरी, निवड प्रक्रिया, मुलाखत प्रक्रिया, सभा, परीक्षा इत्यादी.

आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

उथळ विचारांची माणसे दैवावर विश्वास ठेवतात. शहाणी व समर्थ माणसे कार्यकारणभावावर विश्वास ठेवतात. – इमर्सन

## विद्या प्रसारक मंडळ

### पदवीदान समारंभ

विद्या प्रसारक मंडळाचा १० वा पदवीदान समारंभ दि. ५ सप्टेंबर २०१३ रोजी संपन्न झाला. प्रथेनुसार पारंपारिक वेषात प्रमुख पाहुणे व न्यासपीठावरील अन्य मान्यवर यांनी व्यासपीठावर पदार्पण केल्यानंतर प्रमख पाहुणे दीपक घैसास (चेअरमन व प्रमुख मेन्टॉट MSED), कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी दीपप्रज्ज्वलन केले.

श्री. दीपक घैसास यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर ठरतील असे आपले विचार व्यक्त केले. सदर समारंभात विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र, तंत्र निकेतन येथे घेण्यात येणाऱ्या वि.प्र.मं.च्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली. या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतांना आपल्या भाषणात डॉ. विजय बेडेकर अध्यक्षीय विचार व्यक्त केले.

सदर पदवी दान समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकरी, घटक संस्थांतील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पदवी दान समारंभातील एक दृश्य**

### अनुतारित प्रश्न

- मातेच्या उदरात जन्म घेणारे बाळ नकली औषधांमुळे सुरक्षित आहे का ?
- कचऱ्यातील प्लास्टिक व इतर घनकचऱ्यामुळे गाई – गुरांचे जीवन सुरक्षित आहे का?
- अतोनात जंगल तोडीमुळे पशुपक्ष्यांना निवारा आहे का?
- स्वाईन फ्लू, मलेरिया, क्षय रोग यांपासून मानवी जीवन मुक्त आहे का?
- विनाशकारी प्रकल्पांच्या विळख्यातून सुटका होऊ शकते का?
- येणाऱ्या नव्या पिढीने चालवलेला संगणकाचा अतिरिक्त वापर टाळता येऊ शकतो का?
- वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता अपघात टळू शकतात का?
- वृद्धाश्रमांची वाढती संख्या लक्षात घेता, आपल्याच घरात भविष्यात आपल्याला स्थान मिळेल का?
- अवेळी पडणारा पाऊस, निसर्गाचे बदलते चक्र थांबवणे आपल्या हातात आहे का?
- यज्ञ, कर्मकांड यांतून खरोखरच शांती लाभेल का?
- या सर्व समस्यांचा विचार करता, मानसिक स्वास्थ टिकू शकेल का?
- आपल्या देशाच्या मातीतून अशी अनेक प्रज्वलंत चरित्रे प्रसवली आहेत व त्यांच्या उत्तुंग जीवनांचा आधार आलेख पाहून देशाचा नागरिक होण्याचा अभिमान वाटावा. ज्या देशात अत्युच्च कोटीचे तत्त्वज्ञान निपजले आहे त्या भूमीतील माणसे रडकी का? इतकी लाचार का? आणि का? ... असंख्य प्रश्न! पण का???

– संग्रहातून

---

हिंसक माणूस कधीकाळी अहिंसक होऊ शकतो. परंतु भित्रा माणूस खऱ्या अर्थाने कधीही अहिंसक होऊ शकणार नाही. – महात्मा गांधी



# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

## ❈ सार्थ पसायदान ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्‌गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्‌भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

ज्याला वर जायची इच्छा नाही त्याला तुम्ही शिडीवर चढवू शकणार नाही. – ॲण्ड्र्यू कार्नेजी

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

---

जगात दुसऱ्याला हसण्याइतके सोपे व दुसऱ्यासाठी रडण्याइतके कठीण काम दुसरे कोणते नाही. – सानेगुरुजी

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## शैक्षणिक संस्थांचा समूह

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | डॉ. बेडेकर विद्या मंदिर – मराठी माध्यम शाळा<br>(पूर्वीची रजिस्टर्ड खाजगी मराठी शाळा – १९३४) | १९५८ |
| २ | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मूल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ३ | के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मूल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ४ | विप्रमंचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे मूल्यांकित) | १९७२ |
| ५ | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था<br>(पूर्वीची औद्योगिक व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था)<br>ISO 9001 : 2008 (SGS - UK), एआयसीटीई मान्यताप्राप्त | १९७३ |
| ६ | सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा | १९७६ |
| ७ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन<br>(राष्ट्रीय मूल्यांकन NBA तर्फे मूल्यांकित एआयसीटीई मान्यताप्राप्त) | १९८३ |
| ८ | विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र | १९९६ |
| ९ | विप्रमंचे तंत्रनिकेतन – माहिती व तंत्रज्ञान केंद्र | २००० |
| १० | विप्रमंचे परदेशी भाषा अभ्यास केंद्र | २००८ |
| ११ | विप्रमंचे संरक्षण व व्यूहरचना अभ्यास केंद्र | २००८ |
| १२ | विप्रमंची लंडन अॅकेडमी ऑफ एज्युकेशन अॅन्ड रिसर्च, लंडन | २००९ |
| १३ | विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन केंद्र | २००९ |
| १४ | विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर, जिल्हा रत्नागिरी | २०१२ |
| १५ | विप्रमंची दूरस्थ शिक्षण संस्था | २०१२ |

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

* *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
* *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
* *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.